नं. २८८ म. ग्रं. सं. ठाणें

| | | |
|---|---|---|
| विषय<br>काव्य<br><br>संग्रहालय क्रमांक<br>१२२ | लेखक गो. मो. कालेलकर<br><br>पुस्तकाचें नांव भजनी सामना भाग २ रा | सन<br>१८९३ |

लडिवाळपण

भेटी साहित्य

# दोन भजनांचा सामना.

पहिल्या भजनी मंडळीनें ह्मटलेल्या अभंग, पदे
इत्यादिकांस दुसऱ्या भजनी मंडळीनें
दिलेली चालीला चाल, तालाला
ताल, सुराला सूर व तोड असा

# भजनी सामना.

## भाग १ ला.

हें पुस्तक

**गोविंद मोरोबा कालेंकर**

यांनीं तयार केलें तें,

**व्यंकटेश विठल पै यांनीं**
**जावजी दादाजी यांच्या**
"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८१५—सन १८९३ इ०.

किंमत १२ आणे.

( हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें
नोंदून सर्व हक्क व्यंकटेश विठ्ठल पै यांनीं
आपल्या स्वाधीन ठेविले आहेत ).

# प्रस्तावना.

मुंबई शहरांत अलीकडे भजनी मंडळ्यांचे सामने वरेच होऊं लागले आहेत ह्मणजे एकापेक्षां अधिक भजनी मेळ जवळ जवळ वसून त्यांच्यांत अभंग, पदें वगैरे ह्मणण्याची चढाओढ व चुरस चालते. अशा वेळीं एका भजनीमेळानें जो एक अभंग किंवा पद ह्मटलें कीं त्याच अभंगाच्या किंवा पदाच्या चालीला चाल आणि मिळत्या चरणाचा व अर्थाचा असा अभंग किंवा पद ह्मटल्यास विशेष मौज होईल. ही गोष्ट लक्षांत आणून सामना करणाऱ्या भजनी मंडळीस सामन्याचा एक मार्ग दाखविणारें व भजनास उपयोगीं पडणारें असें हें "दोन भजनांचा सामना" नामक पुस्तक हल्लीं छापून प्रसिद्ध केलें आहे.

यांत दोन भजनी मंडळींचा सामना होत आहे असें कल्पिलें असून, प्रथम एका भजनी मंडळीनें अभंग किंवा पद ह्मटलें, त्याच्याच चालीला चाल, सुराला सूर व

मिळत्या चरणाची व अर्थाची तोड आहे असाच अभंग व पद दुसऱ्या भजनी मंडळीनें ह्मटलें असें दाखविलें आहे. एकंदरींत या सामन्यांत एका भजनी मंडळीनें जीं जीं अभंग, पदें ह्मटलीं त्यांच्याच चालीला चाल, रागाला राग, सुराला सूर व तोड अशीं अभंग, पदें दुसऱ्या भजनी मंडळीनें ह्मटलीं आहेत. राग, ताल, चाल व तोड हीं जितकीं मिळतीं जमतील तितकीं मिळविण्याचा आह्मी होईल तितका प्रयत्न केला आहे.

भजनास बहुतकरून रात्रीं १० वाजतां आरंभ होऊन ३ वाजतां आटपलें तर ६ तास झाले; तेव्हां दोन दोन तासांची एक वारी याप्रमाणें ६ तासांच्या ३ वाऱ्या केल्या आहेत. या भागास चांगला लोकाश्रय मिळाला तर पुढें लवकरच दुसरा भागही छापून प्रसिद्ध करूं.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

# दोन भजनांचा सामना.

अथवा

पहिल्या भजनी मंडळीनें ह्मटलेल्या अभंग, पदें इत्यादिकांस दुसऱ्या भजनी मंडळीनें दिलेली चालीला चाल, तालाला ताल, सुराला सूर व तोड असा.

# भजनी सामना.

## बारी १ ली.

## पहिली भजनी मंडळी.

अभंग १ ला.

अगा ये अर्जुना सावधान मना ॥ जेणें या कामना टाकियेल्या ॥ १ ॥ स्वरूपीं मानस तोषलें सुरस ॥ निधि पायाळास तया रीतीं ॥ २ ॥ स्थितप्रज्ञ तोचि ह्मणूं सव्यसाची ॥

समाधी जयाची अखंडीत ॥ ३ ॥ आनंदें भरीत सर्वकाळ चित्त ॥ तुका ह्मणे स्थितप्रज्ञ ऐसा ॥ ४ ॥

अभंग २ रा.

उठा उठा नारायणा ॥ तुह्मां करितों प्रार्थना ॥ १ ॥ सांगें वृत्तांत सकळ ॥ आलों पाचाराया मूळ ॥ २ ॥ वाट पाहे ती रुक्मिणी ॥ चला वेगीं चक्रपाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाला पाक ॥ देव उठले हरिखें ॥ ४ ॥

अभंग ३ रा.

एक माझा पंढरिनाथ ॥ वरकड टाकावे पाण्यांत ॥ १ ॥ बळिया माझा पंढरिराव ॥ अवघ्या देवांचा हा देव ॥ २ ॥ पंढरिराव माझा बरा ॥ वरकड माळावरल्या गारा ॥ ३ ॥ वरकड देव मोठे मोठे ॥ जैसे माळावरले गोटे

॥ ४ ॥ देवा जीवाचिया जीवा ॥ तुका ह्मणे देवरावा ॥ ५ ॥

अभंग ४ था.

करावी ते स्तुती एका विठलाची ॥ नको मानवाची पोटासाठीं ॥ १ ॥ धरावे ते पाय एका विठलाचे ॥ काय त्या इंद्राचे कामा येती ॥ २ ॥ करावें हें ध्यान एका विठलाचें ॥ चुकती जिवांचे जन्मफेरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या विठलाचें नाम ॥ हेंचि परंधाम प्रेमळासी ॥ ४ ॥

अभंग ५ वा.

करावें कीर्तन ॥ मुखें गावे हरिचे गुण ॥ १ ॥ मग कांहीं नव्हे बाधा ॥ काम दुर्जनाच्या क्रोधा ॥ २ ॥ शांतिखड्ग हातीं ॥

काळासी ते वागविती ॥ ३ ॥ तुका ह्मणे दाता सखा ॥ ऐसा अनंतासारिखा ॥ ४ ॥

अभंग ६ वा.

देव गावा देव गावा ॥ होय विसावा जिवासी ॥ १ ॥ देव सांगों देव सांगों ॥ सुख मागों प्रेमाचें ॥ २ ॥ देव खरा देव खरा ॥ सुरां असुरां अगम्य ॥ ३ ॥ देव दाता देव दाता ॥ केला सरता तुकयासी ॥ ४ ॥

अभंग ७ वा.

क्षणक्षणा जीवा वाटतसे खंती ॥ आठवी चित्तीं पाय देवाजीचे ॥१॥ येईंवो येईंवो येईं लवलाहीं ॥ आलिंगूनि बाहीं क्षेम देईं ॥२॥ उताविळ मन पंथ अवलोकीं ॥ आठवा ते चुकी काय झाली ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या

जीवींची जीवना ॥ घाला नारायणा उडी वेगीं ॥ ४ ॥

अभंग ८ वा.

ह्मणवितों दास ते नाहीं करणी ॥ आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥ १ ॥ गातों नाचतों तें दाखवितों जना ॥ प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥ २ ॥ पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं ॥ बुडालों या डोहीं दंभाचिया ॥ ३ ॥ भांडवल काळें हातोहातीं नेलें ॥ माप या लागलें आ-युष्यासी ॥ ४ ॥ तुका ह्मणे वायां गेलों ऐसा दिसें ॥ होईल या हांसें लौकिकाचें ॥ ५ ॥

अभंग ९ वा.

स्तुति करूं तरी कोण माझी मती ॥ वेदां पडे भ्रांति हें आश्चर्य ॥ १ ॥ परि हा जि-व्हाग्रीं रामकृष्णहरि ॥ वैसलासे करी याति

गुण ॥ २ ॥ रूप गुण सत्कीर्ति कृपाळु उदार ॥ वर्णावया पार ब्रह्मा नेणे ॥ ३ ॥ रूपीं नामीं शिव होऊनियां वेडा ॥ वर्णिला पवाडा रामनामीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे कोणा नेणवेचि सीमा ॥ नाहीं वाचा आह्मां बोलावया ॥५ ॥

अभंग १० वा.

सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण ॥ जों-वरी हा प्राण जाय त्याचा ॥ १ ॥ आणि-कांचा धाक न धरावा मनीं ॥ निरोपा वचनीं टळों नये ॥ २ ॥ समय संभाळूनी आगळें उत्तर ॥ द्यावें भेदी वज्र तयापरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तरी ह्मणवावें सेवक ॥ खादलें तें अन्न हक्क होय ॥ ४ ॥

पद १ लें.

दत्तात्रय अवधूता जनार्दनस्वामि एकना-

था ॥ गुरु दत्तात्रय ॥ दत्तात्रेय अ०॥ ध्रु० ॥ दत्त अवधूत,अवधूत निराकार,स्मरणीं पावे सत्वर॥ शुद्ध अविनाश, अविनाश सुंदर, स्वरूप हें दिसे मनोहर ॥ पतित मी पापी, पापी दुर्धर, नेइं तूं भवसिंधुपार ॥ मागणें हेंची, हेंची सत्वर, मस्तकीं ठेवीं अभयकर ॥ सगुण हें रूप, रूप दावीं आतां, जनार्दनस्वामभि एकनाथा ॥ गुरु दत्ता० ॥ दत्ता० ॥ १ ॥ मुख्य निवास, निवास मेरुशिखरीं, समाधि निद्रा माहूरीं ॥ स्नान सारिलें, सारिलें गंगातीरीं, तिलक रेखिला पंढरीं ॥ मध्यान्ह भिक्षा, भिक्षा करवीरीं, भोजन केलें कावेरी ॥ सायंसंध्या, संध्या सागरीं, मुख्य आसन केदारीं ॥ जाऊनि चरणीं, चरणीं ठेवूं माथा ॥ जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु दत्ता० ॥ दत्ता० ॥ २ ॥ भस्मभूषित,

भूषित दिव्यकांती, माळा त्रिशूळ डमरु हातीं॥ गळां वनमाळ, वनमाळ वैजयंती, कर्णीं कुंडलें सूर्यदिसी ॥ माथां मुकुट, मुकुट चंद्रज्योती, पाहतां वेधली मनोवृत्ती ॥ आकर्ण नयन, नयन मदनमूर्ती, वर्णितां मौनावल्या श्रुति ॥ तेथें मी पामर, काय वर्णूं आतां, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु द० ॥ ३ ॥ अत्रिअनुसूयात्मज दत्त, त्रिगुणअवतार मूर्तिमंत, कटिं मेखळा, मेखळा रत्नजडित, चरणीं नेपुरें रुणझुणत ॥ प्रसन्न हें वदन, वदन हर्षयुक्त, तारिले पतित असंख्यात ॥ अखंड हें नाम, नाम वदनांत, मूर्ति मम बिंबली हृदयांत ॥ अभय वर देईं, देईं गुरुनाथा, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु द० ॥ दत्ता० ॥ ४ ॥ लक्ष चौऱ्यांशीं, चौऱ्यांशीं जन्म वायां, भ्यां भोगिले

गुरुराया ॥ भक्तवत्सला, वत्सला दत्तराया, करावी कृपेची छाया ॥ मागणें हेंचि, हेंचि दत्तराया, न्यावें मातें निजठाया ॥ कृष्णात्मजातें, आत्मजातें तारिं आतां, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु दत्तात्रय, दत्तात्रय अवधूता, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु द० ॥ ५ ॥

पद २ रें.

अरे हरी प्यालों मी प्याला ॥ प्याला नामाचा, छंद लागला विठोबाचा ॥ करून चौरंग, चौरंग देहाचा, आंत खुब जडाव रत्नांचा ॥ च्यारी माचवे, माचवे चौकोनी, केऱ्हांची विठ्ठल रखुमीणी ॥ झालें मी मगन, मगन हरिभजनीं, केऱ्हांची विठ्ठलरखुमीणी ॥ १ ॥ झालें मी मगन ॥ ध्रु० ॥ तीनशें साठ, साठ तुक-

ज्यांचा, चौरंग अमोल मोलाचा ॥ दोरा गुंफि-
ला, गुंफिला सत्वाचा, आकार तिन्ही लोकां
चा ॥ चारी कमळें, कमळें विश्वमोहनीं, केऽहां-
ची विठ्ठलरखुमीणी ॥ झालें मी मगन० ॥ २ ॥
लाऊन दरवाजा, दरवाजा कारागीर, बत्तीस
शिपाई चौकीदार ॥ आणिक नव खिडक्या,
खिडक्या चौफेर, मेरुशिखरें दशमद्वार ॥ तेंही
गुप्त, गुप्त दावोनी ॥ केऽहांचीवि० ॥ ३ ॥
गिलावा रोगण, रोगण हो करुनी, आंत तें
सत्राविचें पाणी ॥ रूप सुंदर, सुंदर नानायो-
नीं, तेज फांकलें त्रिभुवनीं ॥ वर शिवशक्ति,
शक्ति स्थापोनी ॥ केऽहांचीवि० ॥ ४ ॥ ऐसा
चौरंग,चौरंग वनवीला, कोंदणीं हिरा बैस-
वीला ॥ शिवलिंग लोळे, लोळे गुरुचरणीं ॥

केऱ्हांची विठ्ठलरखुमीणी, झालें मी मगन ॥ मगन हरिभजनीं ॥ के० ॥ ५ ॥

पद ३ रें.

रंडी दुर करना दुर करना ॥ ध्यान गुरुका करना ॥ ध्रु० ॥ जबलग हातमें हुवेगा रुका ॥ तबलग रंडि कहे मेरा सखा ॥ रंडी दुर क० ॥ १ ॥ रंडी-प्रीति लगावे खाशी ॥ आखर दिलावेंगी फांसी ॥ रंडी दुर कर० ॥ २ ॥ शिवदिन केसरि प्यारे ॥ कामिककुं पैजार रंडी मारे ॥ रंडी दुरकरना० ॥ ३ ॥

पद ४ थें.

पाहिलें स्वप्न, स्वप्नची अवसरीं ॥ जणूं मीं कां होतें पंढरपुरीं ॥ ध्रु० ॥ करूनि एक चित्त ॥ एकचित्त सत्वर ॥ हरुषलें मन माझें फार ॥ सोडून प्रपंच, प्रपंच घरदार, मिळाले संतांचे भार ॥ हरुषलें मन माझें फार

॥ चाल ॥ जावें संगातीं, एकमेका धरूनीं
हातीं, टाळमृदंग वाजती ॥ जणूं कां द्वारीं ॥
जणूं० ॥ १ ॥ चंद्रभागेसी आला पूर ॥ संत
मिळाले अपार ॥ दिंडीपताका एकसर ॥ होतो
हरिनामाचा गजर ॥ उतरलों पार, पाहिलें
पंढरपूर ॥ जणूं भक्तीचें माहेर ॥ उभा पुंड-
लीकाचे द्वारीं ॥ जणूं पाहिलें० ॥ २ ॥ सहज
मी गेलों, गेलों राउळांत ॥ पाहिली गरुड-
पारीं मात ॥ सभामंडप, मंडप न्याहाळीत ॥
ठेविले कटावरी हात ॥ चाल ॥ पाहिली दृष्टी,
सत्यभामेच्या घेतल्या भेटी ॥ उभे पांडुरंग
जगजेठी, जगजेठी कैवारी ॥ जणूं० ॥ ३ ॥
अहो हरी वाहिला बुका, बुका तुळसीमाळा,
गंध अक्षता प्रेमळा ॥ वसुदेव देवकी, देव-
कीच्या बाळा ॥ नंदयशदा करूं सोहळा ॥

॥ चाल ॥ तुझें नाम घेतां सर्वांसीं पावन होतां ॥ तुकाराम विनविता, विनविता वारंवारी ॥ जणूंका पाहिली पंढरपुरी ॥ ४ ॥

पद ५ वें.

अब तुम कब सुमरोगे राम ॥ ध्रु० ॥ गरभपनोमें हात जुराया ॥ निकल गया बैमान ॥ अब० ॥ १ ॥ बालपनोमें खेल बनाया ॥ तरुनपनोमें काम ॥ अब० ॥ २ ॥ हातपांव जद कांपन लागे ॥ निकलगयो अवसान ॥ अब० ॥ ३ ॥ झुटी काया झुटी माया ॥ आखर मोत निदान ॥ अब० ॥४॥ कहत कबीरा सुन भई साधु ॥ येहि घोडा मैदान ॥ अब० ॥ ५ ॥

पद ६ वें.

या पैशामध्यें लंपट झाले प्राणी ॥ त्यांसीं कदां सुचेना राम येईल ध्यानीं ॥१॥ या वि-

वेकाची मोठी तुफान करणी ॥ तूं कसा जासील भवनदी उतरोनी ॥ २ ॥ आला पूर मायेचा जाईल वसरोनी ॥ तुह्मीं वेळ आल्यावर राम आणाल ध्यानीं ॥३॥ काळ कायेसी गेला खावोनी ॥ आतां दीनवदन होउनी पडाल वनीं ॥ ४ ॥ कृष्ण ह्मणे जगासी कसी केली करणी ॥ आह्मीं कदां न सोडूं पाय तुझे ध्यानीं ॥ ५ ॥

पद ७ वें.

विटेवरी उभीहो विठ्ठले ॥ पहातां मन माझें रमलें ॥ ध्रु० ॥ दीन पाहूनि सुदामा ॥ दिधली कांचनपुरीधामा ॥ भक्तमाउली विठ्ठले ॥ पहातां मन माझें० ॥१॥ दीन पाहूनि दामाजीपंता॥ परिहार झाला श्रीमंता ॥ अर्जी लिहिली विठ्ठले ॥ पहातां मन० ॥ २ ॥ पचविली वाटी

विषाची ॥ लज्जा राखिली मिराबाईची ॥ स्वरूप ओळखिली विठ्ठले ॥ पहातां० ॥ ३ ॥ प्रश्न वाढविला ज्ञानाचा ॥ अभिमान धरला रेड्या-चा ॥ वेद बोलले त्रिवाचा ॥ सेवक झाला नाथाचा ॥ गंध उगळिलें विठ्ठले ॥ पहातां मन माझें रमलें ॥ ४ ॥

सौरी-पद ८ वें.

नीट पाट करूनी थाट ॥ दावीतसे तोरा ॥ आपणाकडे पाहो कोणी ॥ निघाली बाजारा ॥ १ ॥ ते सौरी नव्हे निकी ॥ भक्तीविण फिकी ॥ ध्रु० ॥ चांगभांग करूनी सोंग ॥ दावी माळा मुद्री ॥ रुक्याची आस धरूनि ॥ हालवीती फूदी ॥ २ ॥ थोरे घरीं करी फेरी ॥ तेथें नाचे वरी ॥ जेथें निघे रुका ॥ तेथें हालवी टिरी ॥ ३ ॥ आंत मांग बाहेर चाग ॥

सौरीती नव्हे तेग ॥ तुकादास नटतसे न करी ॥ त्याचा संग ॥ ४ ॥

अभंग ११ वा.

लाज वाटे पुढें तोंड दाखवितां ॥ परि जाऊं आतां कोणापाशीं ॥ १ ॥ चुकलिया कामा मागतों मुशारा ॥ लाज फजितखोरा नाहीं मज ॥ २ पाय सोडुनियां फिरतों वासर ॥ स्वामिसेवे चोर होऊनीयां ॥३॥ तुका ह्मणे मज पाहिजे दंडिलें ॥ पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ४ ॥

अभंग १२ वा.

ऋद्धि सिद्धि दासी कामधेनु घरीं ॥ परि नाहीं भाकरी भक्षावया ॥ १ ॥ लोडें बालिस्तें पलंग सुपति ॥ परि नाहीं लंगोटी नेसावया ॥ २ ॥ पुसाल तरि आह्मां वैकुं-

ठींचा वास ॥ परि नाहीं राह्यास ठाव कोठें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी राजे त्रैलोक्याचे ॥ परि नाहीं कोणाचें उणें पुरें ॥ ४ ॥

अभंग १३ वा.

मोलाचें आयुष्य वेंचतसें सेवे ॥ गुगवतां गोवे खेद होतो ॥ १ ॥ उगवूं आलेती तुह्मी नारायणा ॥ परिहारया शीण निमिषांत ॥ ॥ २ ॥ लिंगाडाचे मासि न्यायें झाली परी ॥ उरली ते उरी नाहीं कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाहो साधीं वाचाबळें ॥ ओढियेलों काळें धांव घाला ॥ ४ ॥

अभंग १४ वा.

मुख्य मूळमंत्र नाम सर्वश्रेष्ठ ॥ ध्यानीं नीळकंठ जप करी ॥ १ ॥ हळाहळशांत करीत तत्क्षण ॥ सुधा संजीवन नाम ह्मणे ॥ २ ॥

जाणे अजामिळ व्याध ध्रुवादिक ॥ परिक्षिती शुक थोर थोर ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझें नाम दीननाथ ॥ भक्त मनोरथ पुरविसी ॥ ४ ॥

अभंग १९ वा.

मी तो अल्प मतीहीन ॥ काय वर्णूं तुझे गुण ॥ उदकीं तारिले पाषाण ॥ हें महिमान नामाचें ॥ १ ॥ नाम चांगलें चांगलें ॥ माझें कंठीं राहो भलें ॥ कपिकुळ उद्धरिलें ॥ मुक्त केलें राक्षसां ॥ २ ॥ द्रोणागिरि कपिहातीं ॥ आणविला सीतापती ॥ थोर केली ख्याती ॥ भरतभेटीसमयीं ॥ ३ ॥ शिळा हो ती मनुष्य झाली ॥ थोर कीर्ती वाखाणिली ॥ लंकादहन केली ॥ हनुमंतें काशानें ॥ ४ ॥ राम जानकी-जीवन ॥ योगियांचें निजध्यान ॥ राम राजी-वलोचन ॥ तुका चरण वंदितो ॥ ५ ॥

अभंग १६ वा.

माय बाप बंधु सोयरा सांगाती ॥ तूंचि माझि प्रीति गणगोत ॥ १ ॥ शरण आलीं त्यांचीं वारिलीं दुरितें ॥ तारिले पतित असंख्यात ॥ २ ॥ इतर कोण जाणे पावले विश्रांति ॥ न येतां तुजप्रति शरणागत ॥ ३ ॥ तयांमध्यें मज ठेवीं नारायणा ॥ लक्षुमीरमणा सोइरिया ॥ ४ ॥ तुका ह्मणे देईं दर्शनाचा लाभ ॥ जे पाय दुर्लभ ब्रह्मादिकां ॥ ५ ॥

अभंग १७ वा.

माझें मज दावा ॥ बोट लावूनी समजावा ॥ १ ॥ ऐसा कोण आहे शहणा ॥ बोट लाऊन दावी खुणा ॥ २ ॥ ऐसा देव आहे कोठें ॥ तेणें पहावा नेटें ॥ ३ ॥ ऐसें तुकयाला दावीलें ॥ तेव्हां समाधान झालें ॥ ४ ॥

### अभंग १८ वा.

माझे तों स्वभाव मज अनावर ॥ तुजही देतां भार कांहीं नव्हे ॥ १ ॥ ऐसें कळों आलें मज नारायणा ॥ जागृती स्वप्ना ताळ नाहीं ॥२॥ संपादितों तो हा अवघा बाह्यरंग ॥ तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य नाहीं पाठपोट ॥ असतें निघोंट एकी जाती ॥ ४ ॥

### अभंग १९ वा.

माझें चित्त तुझे चरणीं ॥ तुझें रूप माझे मनीं ॥१॥ सांपडलों एकमेकां ॥ जन्मोजन्मीं नव्हे सुटका ॥ २ ॥ माझें चित्त तुमचे पायीं ॥ तुमचें चित्त आणिके ठायीं ॥३॥ त्वां बा तोडिली माझी माया ॥ मी बा जडलों तुझ्या पायां ॥ तुका ह्मणे बळी ॥ जीव दिला पायांतळीं ॥४॥

अभंग २० वा.

भले लोक तुज बहु मानवती ॥ वाढेल या कीर्ती जगामाजी ॥ १ ॥ ह्मणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें ॥ नाहींत लेंकुरें झालीं मज ॥ २ ॥ आस निरसूनि कठिण हें मन ॥ करिं वो समान वज्र तैसें ॥ ३ ॥ किंचित हें सुख टाकिं वो थुंकोनि ॥ पावसील धनी परमानंद ॥४॥ तुका ह्मणे थोर चुकती सायास॥ भवबंध पाश तुटोनियां ॥ ५ ॥

पद ९ वें.

संतसमागम मज घडला ॥ आनंदघन हरी सांपडला ॥ ह्मणउनि पावन जालों मी ॥ पूर्ण सुखें निवालों मी ॥१॥ सबाह्य अंतरीं हरी पाहों ॥ मीपण ग्रासोनी स्थिर राहों ॥ २ ॥

मति गति परता मति जाली ॥ ह्मणे केशव चवचव आली ॥ ३ ॥

पद १० वें.

सद्गुरु मार्तंडा मार्तंडा ॥ विवेक झळके खंडा ॥ ध्रु० ॥ औट हात जेजोरी ॥ आत्मा नांदतो मल्हारी ॥ सद्गुरु मा० ॥ १ ॥ चौदाविद्येचा भूगोल ॥ त्रिकुटी करीतसे गोंधळ ॥ सद्गुरु मा० ॥ २ ॥ नव बोधाची दिवटी ॥ तेणें चिन्मय भासे दृष्टी ॥ सद्गुरु मा० ॥ ३ ॥ ज्ञान कोठंबा करीं ॥ दे मज निजनामाची वारी ॥ सद्गुरु मा० ॥ ४ ॥ केशरीनाथ गुरु अवघा ॥ शिव दिन ह्मणे मी झालों वाघा ॥ सद्गुरु मा० ॥ ५ ॥

पद ११ वें.

जमका अजब तडाकाबे ॥ तूं क्या जाने

लडकावे ॥ ध्रु० ॥ बडे मिजाजी कठडे बैठे त-
क्या बिछाइत साजा ॥ मारे झपट कर जबले
जावे जैसा खबुतर बुझा ॥ जमका० ॥ १ ॥
नवबी मरगये दसबी मरगये मरगये सहस्र
अठ्यांसीं ॥ तेहतिस कोटी देवता मरगये पडे
कालके फासीं ॥ जमका अज० ॥ २ ॥ पीर
मरे पैगंबर मरगये ॥ मरगये जिंदाजोगी ॥
जपीतपी संन्यासी मरगये मरगये हकीम
रोगी ॥ जमका अज० ॥ ३ ॥ तीनलोकपर
छत्र बिराजे लुटे कुंजबिहारी ॥ कहत क-
बिरा पाखर या लूटा रयत कोन बिचारी ॥
जमका अज० ॥ ४ ॥

पद १२ वें.

भक्तांसाठीं तो जगजेठी बसोनि माळ्यावर ॥
पाखरें उडवी सारंगधर ॥ ध्रु० ॥ भक्तांमध्यें

भक्ति पहा त्या बोधल्यानें केली ॥ थोंब्या ताटांना कणसें आलीं ॥ ऐसा तो देव अनंत विठ्ठल अनंत रूपें ख्याली ॥ कशी देवभक्तांची माउली ॥ त्याचे चरणांपाशीं विनंती जोडुनियां कर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥१॥ नामदेवासी ह्मणती ब्राह्मण जात तुझी वोंगाळ ॥ नीघ बाहेर करिशी विटाळ ॥ तेव्हां तो गेला देउळामागें ॥ केले दगडाचे टाळ ॥ हरिनें फिरविलें देउळ ॥ अगाध लीला त्याची द्वारका एके खांबावर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ ॥ २ ॥ जनाबाईच्या घरीं भरियेल्या पाण्याच्या घागरी ॥ चहूं हातांनीं रांजण भरी ॥ दळणकांडण धुणें धुवोनी पाटी डोईवरी ॥ गंवऱ्या वेंचुन आणि घरीं ॥ प्रल्हादाला तेव्हां तारिलें जळत अग्नीवर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥

॥ ३ ॥ चोखामेळ्याचे घरीं देवानें सोडिली द्वादशी ॥ तेंव्हां तें श्रुत झालें रायासी ॥ नेलें पाचारुनी रायें तेंव्हां शिक्षा दिधली त्यासी ॥ देवा तूं मार त्याचा खासी ॥ अगाध तुझी माव कळेना तुका जोडुनि कर ॥ पां· खरें उडवी सारंगधर ॥ ४ ॥

पद १३ वें.

काम कुनाम हा सारावा ॥ भेद भयंकर मारावा ॥१॥ तारावा जन तारावा ॥ शोकभय- निधि वारावा ॥२॥ संशय गिरिवर उडवावा ॥ कामसमुच्चय बुडवावा ॥ ३ ॥ विश्रमयोगें श्रम न्यावा ॥ ह्मणे केशव प्रभु मनिं ध्यावा ॥ ४ ॥

पद १४ वें.

जगजीवन गतिनाशक हा ॥ सम्यग्बोध

प्रकाशक हा ॥१॥ फळला रे मज फळला रे ॥
सर्वही राघव फळला रे ॥ २ ॥ विचारसागर
नागर हा ॥ परम मनोहर शंकर हा ॥ ३ ॥
केवळ मंगळदायक हा ॥ तारक केशवनाय-
क हा ॥ ४ ॥

सौरी—पद १५ वें.

टाक रुका चाल रांडे कांगे केली गोवी ॥
पुसोनियां आलें ठाव ह्मणोनि देतें शिवी ॥
ध्रु० ॥ आतां येणें छंदें नाचों विनोदें ॥
नाहीं या गोविंदें माझें मजसीं केलें ॥ १ ॥
कोरडे ते बोल कांगे वेचितेसी वायां ॥ वर्तें
करूनी दावीं तुझ्या मुळींचिया ठाया ॥ २ ॥
याजसाठीं म्यां डोर धरियेला हातीं॥तुका ह्मणे
तुह्मा गांठीं सोडा याची खंती ॥ ३ ॥

# भजनी मंडळी.

## दुसरी.

## बारी १ ली.

### अभंग १ ला.

( याची चालीला चाल व तोड )

अगा ये उदारा अगा विश्वंभरा ॥ रखु-
माईच्या वरा पांडुरंगा ॥ १ ॥ अगा सर्वो-
त्तमा अगा कृष्णा रामा ॥ अगा मेघश्यामा
विश्वजनित्या ॥ २ ॥ अगा कृपावंता जीवन
तूं दाता ॥ अगा सर्व सत्ता धरीतया ॥ ३ ॥
अगा सर्वजाणा अगा नारायणा ॥ करुणा-

वचना चित्त द्यावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे नाहीं अधिकार तैसी ॥ सरती पायांपाशीं केली मागें ॥ ५ ॥

अभंग २ रा.

( चालीला चाल व तोड )

उठा उठा संतजन ॥ करा रामकृष्णभजन ॥ १ ॥ षड्रिपु हे दुर्जन ॥ विसर्जन होतील ॥ २ ॥ गरुडपारीं महाद्वारीं ॥ उभे राहूं नाचूं हरी ॥ ३ ॥ येथें आलों संसारीं ॥ श्रम भारी भोगीले ॥ ४ ॥ चंद्रभागे करुनि स्नान ॥ घेऊं पुंडलीकदर्शन ॥ ५ ॥ महापापाचें निरसन ॥ नीरस्पर्शन भीमेचें ॥ ६ ॥ वाळुवंटीं नाचूं भावें ॥ हेंचि देवासी पावे॥७॥ रामकृष्णाचे गुण गावे ॥ होइल ठावें निजसुखें ॥ ८ ॥ पंढरीची महिमा थोर ॥ पाहुं

सांडूनीयां घोरा ॥ ९ ॥ नाचूं विठलासमोर
आह्मों चोर पूर्वीचे ॥ १० ॥ तुका ह्मणे हित
करा ॥ पाय विठोबाचे धरा ॥ ११ ॥ भुक्ति-
मुक्ति येइल घरा ॥ भव हा तरा हरिनामें ॥ १२ ॥

अभंग ३ रा.

( चालीला चाल व तोड. )

एक माझा भगवंत ॥ देव टाकावे पा-
ण्यांत ॥ १ ॥ एक माझा पांडुरंग ॥ देव
ठायीं ठायीं सोंग ॥ २ ॥ देव होती मोठे मोठे ॥
जैसे माळावरी गोटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे
उगी नका ॥ सुखें हरीनाम घोका ॥ ४ ॥

अभंग ४ था.

( चालीला चाल व तोड. )

करावी ते पूजा मनचि उत्तम ॥ लौकि-
काचें काम काय असे ॥ १ ॥ कळावें तयासी

कळे अंतरींचें ॥ कारण तें साचें साचाअंगीं ॥ २ ॥ अतिशयाअंतीं लाभ किंवा घात ॥ फळ देतें चित्त बीजाऐसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेणें राहे समाधान ॥ ऐसें तें भजन पार पावी ॥ ४ ॥

अभंग ५ वा.

( चालीला चाल व तोड. )

करावें चिंतन ॥ तेंचि बरें न भेटून ॥ १ ॥ बरवा अंगीं राहे भाव ॥ मग तोचि जाणा देव ॥ २ ॥ दर्शनाची उरी ॥ अवस्थाचि अंग धरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन ॥ तेथें सकळ कारण ॥ ४ ॥

अभंग ६ वा.

( चालीला चाल व तोड. )

देव गोंवा देव गोंवा ॥ जिवीं जिवा जि-

व्हाळ ॥ १ ॥ देव पळे देव पळे ॥ भक्त भोळे त्यापाशीं ॥ २ ॥ देव राहे देव राहे ॥ वस्ती पाहे हृदयीं ॥ ३ ॥ देव सरिसा सरिसा ॥ तुका कैसा भाविक ॥ ४ ॥

अभंग ७ वा.

( चालीला चाल व तोड. )

क्षणक्षणा हाचि करावा विचार ॥ तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥ नाशवंत देह जाणार सकळ ॥ आयुष्य खातो काळ सावधान ॥२॥ संतसमागमीं धरुनी आवडी ॥ करावी तांतडी परमार्थी ॥ ३ ॥ तुका ह्मणे इहलोकींच्या वेव्हारें ॥ नये डोळे धुरें भरुनी राहों ॥ ४ ॥

अभंग ८ वा.

( चालीला चाल व तोड. )

ह्मणवितों दास न करितां सेवा ॥ लंड-

पणें देवा पोट भरीं ॥ १ ॥ खोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं ॥ अंतर जाणसी पांडुरंगा ॥२॥ आचरण खोटें आपणासी ठावें ॥ लटिकें बोलावें दुसरें तें ॥ ३॥ तुका ह्मणे ऐसा आहें अपराधी ॥असो कृपानिधी तुह्मां ठावा ॥ ४॥

अभंग ९ वा.

( चालीला चाल व तोड. )

स्तुति करूं तरी नव्हेचि या वेदा ॥ तेथें माझा धंदा कोणीकडे ॥ १ ॥ परी हे वैखरी गोडावली सुखें ॥ रसना रसमुखें इच्छितसे ॥ २ ॥ रूप वर्णावया कोठें पुरे मती ॥ रोमीं होती जाती ब्राह्मांडें हीं ॥३॥ तुका ह्मणे तूंचि ऐसा एक साचा ॥ ऐसी तंव वाचा झाली नाहीं ॥ ४ ॥

अभंग १० वा.

( चालीला चाल व तोड. )

सेवकासी आज्ञा निरोपासी काम ॥ स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे ॥ १ ॥ मनाचिये मुळीं सहावें बैसोन ॥ अकशावे गुण पायांपासीं ॥ २ ॥ भेटीचे तांतडी करितसे लाहो ॥ ओंवाळावा देहो ऐसें वाटे ॥३॥ तुका ह्मणे माझें करावें कारण ॥ आपुलें जतन ब्रिद साचें ॥४॥

पद १ लें.

( चालीला चाल व तोड. )

दत्तात्रय अवधूता जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु दत्तात्रय० ॥ ध्रु० ॥ जन्म दिला, दिला राव देवानें, वागविलें मातापित्यानें ॥ कडि खांद्यावर, खांद्यावर घेऊन, रजाचा गज करून ॥ नवखंड दाखविलें, दाखविलें त्यानें, कृपेचा सागर होऊन ॥ ह्मणून मी सेवा, क-

रीन एकचित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्तात्रय० ॥ १ ॥ मायबापाचे, बापाचे उपकार, शिरावर झाले बहु फार ॥ पाजला अठरा, अठरावी धार, अवघें त्याचें शरीर ॥ ह्मणून मी सेवा, करिन एकचित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्तात्रय० ॥ २ ॥ मायबापाचे, बापाचे कृपेनें, विठ्ठराव आले चालून ॥ कर कटीवर, कटीवर ठेवून, उभे विटेवर राहून ॥ असा एक पुत्र, पुत्र श्रावण, कावड केली हौसेन ॥ काशिला जातो, जातो श्रावण, लागली निर्वाणीं तान ॥ झारी घेऊन, जात श्रावण, बाण मारिला दशरथान ॥ श्रावण ह्मणे रे, ह्मणे रे दशरथा, पाणी घेऊन पाजीं मातापित्या ॥ अखंड सेवा, घडो तुज एकचित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्ता-

त्रय० ॥ ३ ॥ मायबापाचे, बापाचे कृपेनें, गुरु म्यां केला सज्जन ॥ कान फुंकिले, फुंकिले गुरूनें, विद्या दिली भगवंतानें ॥ रामचंद्रनाथ, नाथ गावण, पितृभजनीं त्याचें ध्यान ॥ ह्मणून मी सेवा करिन एकचित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरु दत्तात्रय, दत्तात्रय अवधूता, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरु दत्तात्रय० ॥ ४ ॥

पद २ रें.

( चालीला चाल व तोड. )

माझी विनवणी, विनवणी हरिला सांगा ॥ कधीं भेटसील पांडुरंगा ॥ ध्रु० ॥ अहो हरी, संत तुह्मी दयाळ ॥ दयाळ करूनि कृपा ॥ भेटवा केशव मायबापा ॥ भवनदीं बुडतों ॥ बुडतों भवतापा ॥ कोण सोडविल देवा आतां ॥

चाल ॥ काय मी करूं ॥ अरे हरी काय मी करूं ॥ कोणता मार्ग मी धरूं ॥ तोड ॥ धरूं संतसंगा ॥ कधीं भेटसील पां० ॥१॥ अरे हरी गोपीवल्लभा॥वल्लभा गोपवेशा॥मज दाविसी हृषीकेशा ॥ हरि तुजविण, तुजविण दाही दिशा ॥ विघ्न निवारीं हृषीकेशा ॥ चाल ॥ अहो हरि जीव बावरा ॥ भवनदी खोल भोंवरा ॥ धांवूनि मज आवरा ॥ तोड ॥ आवरा अंतरंगा ॥ कधीं भेटसील पांडुरंगा० ॥ २ ॥ अहो हरीबहिण द्रौपदी ॥ द्रौपदीच्या काजा, कैसा पावला यदुराजा ॥ वस्त्रें पुरविलीं, पुरविलीं महाराजा ॥ लज्जा राखिली अधोक्षजा ॥ चाल ॥ अहो हरि ऐका करुणा ॥ सांवळिया नारायणा ॥ तोड ॥ सकळ दुर्जना दुरितभंगा ॥ कधीं भेटसील पांडुरंगा ॥ ३ ॥

अहो हरी करुणा भाकीत, भाकीत दिनरजनीं ॥ दीन माधवा मोक्षदानी ॥ माझे अपराध ॥ अपराध करा श्रवणीं ॥ किती आळवी चक्रपाणी ॥ चाल ॥ अहो हरि झालों बा वेडी ॥ जिव जातां बहु तांतडी ॥ तुजविण जिवलग गडी ॥ तोड ॥ शुंड केशवी परमानंदा ॥ कधीं भेटसी० ॥ ४ ॥

पद ३ रें.

( चालीला चाल व तोड. )

बंदे क्यौं भुला क्यौं भुला ॥ आखर खावेगा झोला ॥ बंदे० ॥ ध्रु० ॥ कवडी कवडी माया जोडी ॥ आखर जावेगा खुला ॥ बंदे क्यौं भुला० ॥१॥ भाई बहिन जोरु लरके ॥ कोन किसीका साला ॥ बंदे क्यौं० ॥२॥ शिवराम कहे समाल बंदे ॥ कर साहेबसों सल्ला ॥ बंदे क्यौं भुला क्यौं भुला ॥ ३ ॥

## पद ४ थें.

( ४ थ्या पदाची तोड. )

सखे साजणी जिवलग गडणी स्वप्न पाहिलें डोळां ॥ आकाशीं देखिला एक मळा ॥ ॥ ध्रु० ॥ पहिले प्रहरीं उफराटी विहिर मोट लाविली एक ॥ खालीं नाडा वरती चाक ॥ तीन बैल आणि माळी निजला अमोलीक ॥ पिकलें पिक तेथें कोल्हा संचकला एक ॥ चाल ॥ या कोल्ह्याला तीन मस्तकें दोन तोंडें थान एक ॥ एक पाठ वाहे उदक ॥ तोड ॥ नार देखणी पहाया गेलों विवशी पडली गळां ॥ आकाशीं देखिला एक मळा ॥ १ ॥ दुसरे प्रहरीं स्वप्न देखिलें आइका चित्त देऊन ॥ केलें मडकें कुंभारान ॥ त्या मडक्याला नऊ छिद्रें आंत भरलें जिवन ॥ त्यामध्यें एक कामीन ॥ चाल ॥

तिच्या मुखांत चवदा लोक ॥ जळीं असून पडला सोक ॥ गेला कुंभार तिच्या पोटांत ॥ तोड ॥ ठाऊक असेल ह्मणून पुसतों तुला ॥ आकाशीं दे० ॥ २ ॥ तिसरे प्रहरीं गाय देखिली काय सांगूं कौतुक ॥ तिच्या मुखांत चौदा लोक ॥ तिजला पाहतां दृष्टि ठरेना कोठें तिची बैठक ॥ दोन तोंडें थान एक ॥ चाल ॥ तिचा पार कळेना कोणा ॥ वेदशास्त्रपुराणां ॥ गुरुमतीच्या खुणा ॥ तोड ॥ ठाऊक असेल ह्मणून पुसतों तुला ॥ आकाशीं० ॥ ३ ॥ चवथे प्रहरीं ब्रह्ममूर्ती मन करून निश्चळ ॥ तिथें पार्वतीची एक वेल ॥ त्या वेलीची खटपट सरली पहाया बीजाचें मूळ ॥ तेथें ईश्वर गण केवल ॥ चाल ॥ तेथें वाद्यें वाजती दहा ॥ सद्गुरुकृपा तरी पहा ॥ कवी नाथ निरंजन

महा ॥ तोड ॥ जिकडे तिकडे व्यापक अवघा हाची घन दाटला ॥ आकाशीं० ॥ ४ ॥

पद ५ वें.

( चालीला चाल व तोड. )

कायकु देह धरोरे अभागी ॥ काय० ॥ध्रु० ॥ इस सुख ब्रह्मा इस सुख पायो ॥ निज पद क्यौं बिसरोरे ॥ अभागी काय० ॥ १ ॥ श्यामसुंदरकी सेवा चूकी ॥ उपजत क्यौं न मरोरे ॥ अभागी काय० ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभई साधू ॥ नहीं तो नरकीं पडोरे ॥ अभागी कायकु देह धरो ॥ ३ ॥

पद ६ वें.

मी गुंतलों प्रपंचामधीं कीं महाडोहीं ॥ येथून कधीं काढिसी विठाबाई ॥ १ ॥ या प्रपंच्याचा पडदा पडला कायी ॥ यासी सद्गुरु-

वाचुनि सांपडेना सोई ॥ २ ॥ मी सद्गुरुसी शरण गेलों कायी ॥ त्यानें डोळ्यांमध्यें अंजन भरलें बाई ॥ ३ ॥ त्या अंजनाचा गुण सांगूं कायी ॥ प्रत्यक्ष मूर्ती वसे हृदयाचेठायीं ॥ ४ ॥ कृष्ण ह्मणे धरावे श्रीहरीचे पायी ॥ हे पाय धरल्यावर जन्मगती न होई ॥ ५ ॥

पद ७ वें.

( सातव्या पदाच्या तोडीवर. )

देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव कां० ॥ ध्रु० ॥ नका पुसूं बाई ॥ वेदासी काहीं ॥ कळलें नाहीं ॥ तोड ॥ शेष शिणला झाल्या दोन जिभा जिभा ॥ देव० ॥ १ ॥ सखी पुसे सखयासीं ॥ युगें अठाविस झालीं कीं ॥ चाल ॥ कटावरी कर ॥ भीमातीर ॥ तोड ॥ वाळवंटीं संतसभा

सभा ॥ देव० ॥ २ ॥ तेथें गोपाळ लुटती
काला ॥ हारीनामें तयांचा गलबला ॥ चाल ॥
गण नाहीं गोत ॥ मिळाले संत ॥ तोड ॥
आला तयांचीया लोभा लोभा ॥ देव० ॥३॥
हरि वैकुंठ सांडुनी ॥ आला पुंडलीकालागुनी
॥ चाल ॥ युगानुयुगीं ॥ भक्तांलागीं ॥ तोड ॥
वाळवंटीं संतशोभा शोभा ॥ देव कांहो विटे-
वरी उभा उभा ॥ ४ ॥

सौरी—पद ८ वें.

( चालीला चाल व तोड. )

हाट करोनी घराशी आली बसली वोस-
रीच्या कांठींरे ॥ घरांतली बाईल बाहेर निघाली
वसवस लागे पाठीरे ॥ शंकीन बाबा डंकीन
त्या घरीं शंकीन बाबा डंकीनरे ॥ शंकी० ॥१॥
चौंशेरांचा वरणभात केला, वर भाजीचा

गोळारे ॥ मोठे मोठे घास घेतां, दुरूनीच मारी डोळारे ॥ शंकीन बाबा डं० ॥ २ ॥ आठ भाकऱ्या बारा पोळ्या, खिरडीं घातलीं सोळारे ॥ पाणी पिऊनी ढेकर दिला, हिचा मराठी मोळारे ॥ शंकीन बा० ॥ ३ ॥ बारा सोळा लुगडीं नेसली, येईना पाठीं पोटींरे ॥ सात खणांची चोळी शिवली, उराशीं येईना गांठीरे ॥ शंकीन बा० ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं ऐशी बाईल केलीरे ॥ तिच्या प्रसंगीं सारीं दैवतें पळोनियां गेलींरे ॥ शंकीन बाबा डं० ॥ ५ ॥

अभंग ११ वा.

( चालीला चाल व तोड. )

लाज वाटे मज मानिती हे लोक ॥ हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥ १ ॥ मोजुनि झि-

जलों मापाचियापरी ॥ जाळावी हे थोरी लाभाविण ॥ २॥ कोमल कंटक तीक्ष्ण अगरी ॥ पोचट ते वरी अंगकांती ॥ ३ ॥ चित्रींचे लेप शृंगारिलें निकें ॥ जीवेंविण फिकें रूप त्याचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे दिसे वायां गेलों देवा ॥ अनुभव ठावा नाहीं तेणें ॥ ५ ॥

अभंग १२ वा.

( चालीला चाल व तोड. )

ऋद्धि सिद्धि भुक्ति मुक्ति श्रुति प्रीति ॥ अंकिला निश्चिती न्हे यांचा ॥ १ ॥ सर्वाश्रेष्ठ सुख आहे माझे मनीं ॥ विठ्ठलावांचोनी नेणें कांहीं ॥ २ ॥ पाप पुण्य दोन्ही कर्माकर्मवर्म ॥ नेणें धर्माधर्म हेंही कांहीं ॥ ३ ॥ ध्यायें ध्यान नेम धारणासाधन ॥ विठोबावांचून दुजें नाहीं ॥ ४ ॥ तुझें ध्यान

आतां हृदयीं अनंता ॥ दुःख निवारिता नाम एक ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुझा दास मी असतां ॥ न भियें मी आतां कळीकाळा ॥६॥

अभंग १३ वा.

( चालीला चाल व तोड. )

मोलाचें आयुष्य वेंचुनियां जाय ॥ पूर्वपुण्यें होय लाभ याचा ॥ १ ॥ अनंत जन्मींचें शेवट पाहतां ॥ नरदेह हाता आला तुझ्या ॥ २ ॥ कराल ते जोडी येइल कार्यासी ॥ ध्यावें विठ्ठलासी सुखालागीं ॥ ३ ॥ सांचलिया धन होईल ठेवणें ॥ तैसा नारायण जोडी करा ॥ ४ ॥ करा हरिभक्ति लोकीं ती ये कामा ॥ सोडवील यमापासोनियां ॥ ५ ॥ तुका ह्मणे करा आयुष्याचें मोल ॥ नका वेचूं बोल नामेंविण ॥ ६ ॥

अभंग १४ वा.

( चालीला चाल व तोड. )

मुख्य मूळक्षेत्र नाम सर्वां श्रेष्ठा ॥ पंढरी वैकुंठ भूमीवरी ॥ १ ॥ यारे तुह्मी आतां करा हरिकथा ॥ कुटावा अनंता होईल त्या ॥ २ ॥ जाणे अजामिळ व्याध ध्रुवादिक ॥ परिक्षिती शुक थोर थोर ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझें नाम दीननाथ ॥ भक्तमनोरथ पुरविशी ॥ ४ ॥

अभंग १५ वा.

( चालीला चाल व तोड. )

मी तो दीनाहूनि दीन ॥ माझा तूज अभिमान ॥ १ ॥ मी तो आलों शरणागत ॥ माझें करावें स्वहित ॥ २ ॥ दिननाथा कृपाळुवा ॥ सांभाळावें आपुल्या नावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां ॥ भलें नव्हे मोकलितां॥४॥

अभंग १६ वा.

( चालीला चाल व तोड. )

माय बाप बंधू सोइरे श्रीहरी ॥ माझा सुखकारी पांडुरंग ॥ १ ॥ माय बाप काळाहातीं ओगरती ॥ विठो काळाप्रती पाहों नेदी ॥ २ ॥ जन्मवरी आह्मी हरीनाम गावें ॥ वडीलें भुलावें वेव्हारासी ॥ ३ ॥ हरिकथा करितां सोयरे हांसती ॥ संत संतोषती तुका ह्मणे ॥ ४ ॥

अभंग १७ वा.

( चालीला चाल व तोड. )

माझें मज द्यावें ॥ नाहीं करवीत नवें ॥ ॥ १ ॥ सहस्र नामांचें रूपडें ॥ भक्तकैवारी चोखडें ॥ २ ॥ साक्षीविण बोलें ॥ तरी मज पाहिजे दंडिलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माल ॥ माझा खरा तो विठ्ठल ॥ ४ ॥

### अभंग १८ वा.

( चालीला चाल व तोड. )

माझें तों फुकाचें कायेचेचि कष्ट ॥ नव्हे क्रियानष्ट तुह्मांऐसा ॥ १ ॥ कांहींच न वंचीं आजिच्या प्रसंगीं ॥ सकळांही अंगीं करीन पूजा ॥ २ ॥ द्यावें कांहीं तुह्मी हे तों नाहीं आस ॥ असों या उदास देहभावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी मावळली खंति ॥ समाधान चित्तीं सर्वकाळ ॥ ४ ॥

### अभंग १९ वा.

( चालीला चाल व तोड. )

माझें चित्त तुझे पायीं ॥ राहे ऐसें करीं कांहीं ॥ धरोनियां बाहीं ॥ भव तारीं दातारा ॥ १ ॥ चतुरा तूं शिरोमणि ॥ गुण लावण्याची खाणी ॥ मुगुट सकळां मणि ॥ तूंचि धन्य विठोबा ॥ २ ॥ करी तिमिराचा नाश ॥ दीप

होउनि प्रकाश ॥ तोडी आशापाश ॥ करी वास हृदयीं ॥ ३ ॥ पाहें गुंतलों नेणतां ॥ तुज असो माझी चिंता ॥ तुका ठेवी माथा ॥ पायीं आतां राखावें ॥ ४ ॥

अभंग २० वा.

( चालीला चाल व तोड. )

भले लोक नाहीं सांडीत वोळखी ॥ हे तों झाली देखी दुसऱ्याची ॥ १ ॥ असो आतां यासी काय चाले बळ ॥ आपुलें कपाळ वोढवलें ॥ २ ॥ समर्थासि काय कोणें हें ह्मणावें ॥ आपुलिया जावें भोगावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मां बोल नाहीं देवा ॥ नाहीं केली सेवा मनोभावें ॥ ४ ॥

पद ९ वें.

( चालीला चाल व तोड. )

भवहर शंकर सेविसिना ॥ हृदय सरोजीं

ठेविसिना ॥ १ ॥ ह्मणवुनियां गति न घडेरे ॥ निजसुख ठायीं न पडेरे ॥ ध्रु० ॥ श्रवणें मननें विवळिसिना ॥ अमल प्रयोगें निवळिसिना ॥ २ ॥ जाणीव नेणीव सोडिसिना ॥ ह्मणे केशव केशव जोडिसिना ॥ ३ ॥

पद १० वें.

( चालीला चाल. )

इतुकें दे मजला दे मजला ॥ मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥ संतसमागम जोडी ॥ माझी मीपण वाट मोडी ॥ इतुकें दे मजला ॥ १ ॥ संतसमागम अर्चा ॥ सारासार ज्ञानचर्चा ॥ इतुकें दे मज० ॥ २ ॥ संत घराप्रती येती ॥ भक्तिभावें पूजीन त्यांसी ॥ इतुकें० ॥ ३ ॥ भगवद्भजनीं जागो ॥ तुझिये स्वरूपीं लक्ष लागो ॥ इतुकें० ॥ ४ ॥ हेंचि मागणें मागे ॥ भावें केशव चरणां लागे ॥ इतुकें० ॥ ५ ॥

## पद ११ वें.

( चालीला चाल व तोड. )

जमसों नहीं डरूंगाबे ॥ हरिका भजन करूं गाबे॥ध्रु०॥ अहंता मारूं ममता मारूं खान जाद मैं कहाऊं॥ मन मेरा अब चौकस राखूं चित्त चैतनमें मिलाऊं॥ जमसों नहीं डरूंगाबे ॥ हरिका० ॥ १ ॥ रामनामका घोडा मेरा मैदानमें दवडाऊं ॥ भजनप्रताप हातमें बर्छी सन्मुख लेकर जाऊं॥ जमसों नहीं० ॥ २ ॥ और लोक कसबेके चाकर मै हुजूरका काजी॥ काम क्रोधकी गरदन मारूं साहेब राखूं राजी॥ जमसों नहीं डरूंगा० ॥ ३ ॥ मैं साहेबका सच्चा चाकर मेरा नाम कबीरा ॥ सब संतनकूं शिष नमाऊं जो हरि पारखे हिरा ॥ जमसो नहीं डरूंगाबे ॥ हरिका० ॥ ४ ॥

## पद १२ वें.

( चालीला चाल व तोड. )

धुतांच मोतीं जळीं हरपलें सखोल मोठें पाणी ॥ चला पाहूं सहा चार अठराजणी॥धु०॥ प्रपंच धोंडा मृगजळ पाणी आपटीत होतें चोळी ॥ विसरलें सुख घसरलें तळीं ॥ सखे मायेनें मोतीं दडपिलें भवसिंधूच्या जळीं ॥ होती गडे भ्रांति बहिण जवळी ॥ तिणें मजला गोष्टी विनविल्या चित्त गेलें भुलोनि ॥ चला पाहूं०॥ ॥१॥ आठजणींनीं मोतीं दडविलें वर ठेविला धोंडा ॥ अशाच पहाती अवघ्या रांडा ॥ बारा सोळा तळीं उतरल्या त्यांनीं धरिला दांडा ॥ ठाउक सत्रावीला झेंडा ॥ त्यामध्यें मी गर्क झालें एकलिच बाई वनीं ॥ चला पाहूं० ॥ ॥ २ ॥ चवघीजणी सत्वर मिळोनि डोळीं

अंजन घाला ॥ माझ्या मोत्याला प्रेमें न्याहाळा ॥ ज्ञान बोधाची लावून दिवटी बरवी वात उजळा ॥ माझे मोत्याला सर्व कळा ॥ प्रपंचपडदा फाडून गुरुपदीं लावागे ठिकाणीं ॥ चला पाहूं० ॥ ३ ॥ चौघीजणी मोक्षनाइका मजला धरा हातीं ॥ उतरा सागरपैलपंथीं ॥ या मोत्याच्यासाठीं मजला जाणें आहे सती ॥ ह्मणून मी येतें काकुळती ॥ ज्ञानदेव ह्मणे चिन्मय मोतीं न मिळे गुरुवांचूनी ॥ चला पाहूं० ॥ ४ ॥

पद १३ वें.

( चालीला चाल व तोड. )

क्षणक्षणा कां मरिजेरे ॥ सज्जनसेवा करिजेरे ॥ १ ॥ राम सनातन वरिजेरे ॥ अपार माया तरिजेरे ॥ ध्रु० ॥ कवळुनियां हरि

धरिजेरे ॥ प्रेमरसें जन भरिजेरे ॥ २ ॥ जाणीव नेणीव हरिजेरे ॥ ह्मणे केशव केशव वरिजेरे ॥ ३ ॥

पद १४ वें.

( चालीला चाल व तोड. )

रमणीयनामा सुखधामा ॥ स्वयंप्रकाशा निजरामा ॥ १ ॥ अखंड आह्मी तुज पाहों ॥ उपाधि निरसुनि स्थित राहों ॥ ध्रु० ॥ सकळ विकारातित सारा ॥ अविकारा निजदातारा ॥२॥ अति मंगळ केशव कमनीया ॥ ह्मणे केशव सज्जन भजनीया ॥ ३ ॥

पद १५ वें.

( चालीला चाल व तोड. )

उभी राहें रांडे शब्द चाल भांडे ॥ शब्द चाल भांडे ॥ ध्रु० ॥ काजळ कुंकूं लेउनि रांडे

किती करशील नखरा ॥ किती० ॥ मिळीण होऊनी रुद्र नेला ठकवीलें त्वां शंकरा ॥ उभी राहें रांडे० ॥ १ ॥ साही त्रिकूट अठरा साडे तेही वेडावली ॥ तेही वे०॥ चौघीजणीं वाद केला तेही धुंडावली ॥ उभी राहें रांडे० ॥२॥ दुर्वासासीं गर्व केला तेथें झालीस घोडी ॥ तेथें झा० ॥ कोठें ह्मणतां लाज नाहीं डागवीया घोडी ॥ उभी राहें रांडे० ॥ ३ ॥ शुकाशीं जाऊनी रांडे काय उजेड केला ॥ काय उ० ॥ मारुनी ज्ञानबाण तुझा ह्मोरा फिरविला ॥ उभी राहें रां० ॥ ४ ॥ रामदासें पर्णूनि तुला लग्नीं टाकुनी दीलें ॥ लग्नीं टा० ॥ संतसंगती जाणुनियां फार फजीत केलें ॥ उभी राहें० ॥ ५ ॥

# भजनी मंडळी.

## पहिली.

## बारी २ री.

अभंग १ ला.

बहुजन्में सोस केला ॥ त्याचा झाला परिणाम ॥ १ ॥ विठ्ठलसें नाम कंठीं ॥ आवडी पोटीं संचितें ॥ २ ॥ येथूंन तेथवरी आतां ॥ नलगे चिंता करावी ॥ ३ ॥ तुका ह्मणें धालें मन ॥ हेंचि दान शकुनाचें ॥४॥

अभंग २ रा.

प्रथम भाव चित्तीं धरा ॥ अंगीं वैराग्यातें वरा ॥ १ ॥ भक्ति पाहिजे शिरजोर ॥

मुखीं हरिनामगजर ॥ २ ॥ ब्रह्मज्ञानी तो पुरता ॥ आणिक योग तो कोणता ॥३॥ तुका ह्मणे तोचि नर ॥ जाणे संतांची कद्र ॥४॥

अभंग ३ रा.

पंढरीची वारी जयाचिये घरीं ॥ पायधूळी शिरीं वंदिन त्याची ॥ १ ॥ दासाचा मी दास पोसणा डोंगर ॥ आतां बहु फार काय बोलों ॥ २ ॥ जातीचा मी हीन न कळे भजन ॥ ह्मणोनि संतचरण इच्छीतसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज ह्मणावें आपुलें ॥ बहुतां तारिलें संतजनीं ॥ ४ ॥

अभंग ४ था.

धन्य धन्य भीमातीर ॥ स्नान करिती ऋषेश्वर ॥ १ ॥ धन्य तोचि वेणुनाद ॥ क्रीडा करितो गोविंद ॥ २ ॥ धन्य पद्माळांची

पाळीं ॥ गाई चारिल्या गोपाळीं ॥ ३ ॥ धन्य धन्य पंढरीराव ॥ ऐसें बोले तुकादास ॥ ४ ॥

अभंग ५ वा.

दुर्जनांचा संग नको धरूं जना ॥ होतील यातना नानापरी ॥ १ ॥ तुजलागीं नेती यमाचे भुवना ॥ करिती यातना बहुपरी ॥ २ ॥ तांबीयाची भूमीवरी तापविती ॥ वरि लोळविती प्राणियासी ॥ ३ ॥ जळतिया खांबा तुज खोंचविती ॥ यम ते ह्मणती घेई सुख ॥४॥ सहज सत्संगें चैतन्यआनंद ॥ स्मरतां गोविंद प्राण लोटे ॥ ५ ॥ तुका ह्मणे संतसंग हा सुखाचा ॥ तोडित यमाचा पाश सर्व ॥ ६ ॥

अभंग ६ वा.

अहो देवा कृपामूर्ती ॥ गुणसंपत्तीनिधा-

ना ॥ १ ॥ पिंड पदीं समर्पिला ॥ आह्मी आपुला जीवभाव ॥ २ ॥ न मागों कांहीं अणुमात्र ॥ कृपापात्र करावें ॥ ३ ॥ निळा ह्मणे विज्ञापना ॥ परिसा दीना रंकाची ॥

अभंग ७ वा.

आवडोनि रूप मनीं ॥ धरिलें वदनीं हरिनाम ॥ १ ॥ त्याचें सांग झालें सकळ ॥ आलियाचें फळ नरदेहा ॥ २ ॥ रुचला संतसमागम ॥ आपुलिया धर्म कुळाचा ॥ ३ ॥ निळा ह्मणे भगवत्कथा ॥ गातां ऐकतां निजमोक्ष ॥ ४ ॥

अभंग ८ वा.

अरे अरे ज्ञाना ज्ञान हें निवृत्ती ॥ देहीं देहा उपरती तुज प्राप्त ॥ १ ॥ अर्थावबोध

अर्थूनी दाविला ॥ ज्ञानीयां तूं भला ज्ञानदे-
वा ॥ २ ॥ सोहंतत्व साधलें प्रमाण सर्वत्रीं ॥
उभयतां गात्रीं प्रेमतनू ॥ ३ ॥ बिंबिं बिंब-
रसीं उपरम देखिला ॥ प्रपंच शोखिला तुवां
एकें ॥ ४ ॥ विष्णुनाममंत्र सोहंतेजदिव-
टा ॥ उजळून चोहटा शुद्ध केला ॥ ५ ॥
निवृत्तीचा शिष्य ज्ञानदेवीं भाष्य ॥ शांति
समरस बोध उतरे ॥ ६ ॥

अभंग ९ वा.

रामनाम वेदोवाणी ॥ मना झाली स-
माधानी ॥ १ ॥ ह्मणतां राम वेळोवेळा ॥
जळती पापें अग्निज्वाळा ॥ २ ॥ रामना-
माचा प्रताप ॥ काय पुढें येइल पाप ॥ ३ ॥ शि-
वदास ह्मणे नाम ॥ आह्मी हेंचि केलें काम ॥ ४ ॥

अभंग १० वा.

माझे गडी कोण कोण ॥ यारे भिन्न निवडोनी ॥ १ ॥ अवघे मिळोनी एक व्हारे ॥ नाहीं तर जारे मागुते ॥ २ ॥ रेघा ओढून धरा पाटी ॥ जीका गडी शेवटीं तो ॥ ३ ॥ अवघे एक सुरीतुता ॥ पाहारे आतां जातों मी ॥ ४ ॥ शिवदासें केली फळी ॥ झाली रळी गड्यांची ॥ ५ ॥

पद १ लें.

अखंड खंडे रायारे ॥ भजनीं दूरी करिं माया ॥ १ ॥ ह्मणउनि पायां लागतसें ॥ अक्षय निजपद मागतसें ॥ २ ॥ प्रपंच मन्मथ मल्लारी ॥ त्रिपुरारी मम श्रम वारी ॥ ३ ॥ देउनि तारक पदसेवा ॥ केवळ मंगल करिं देवा ॥ ४ ॥ निश्चळ देउनि त्रिकाळीं ॥ अ-

ति गतीनें मज सांभाळीं ॥ ५ ॥ प्रेमपुराप्रति मज नेई ॥ ह्मणे केशव अद्वय निजदेहीं॥६॥

पद २ रें.

वरवें जाणावें जाणावें ॥ जाणणें मात्रचि व्हावें ॥ वरवें० ॥ ध्रु० ॥ प्रपंच कैंचा बा त्यागावा ॥ आत्मा कैसा अनुभवावा ॥ १ ॥ वरवें० ॥ अवघें परतत्वपरिपूर्ण ॥ ह्मणतां उतरलें दूजें कोण ॥ २ ॥ वरवें० ॥ केशवराजीं हा निजबोध ॥ बोधा न घडे किंचित भेद ॥ ३ ॥ वरवें० ॥

गौळण-पद ३ रें.

आल्या पांच गौळणी पांच रंगांचा शृंगार करूनी ॥ आ० ॥ पहिली गौळण रंग सफेत ॥ जसी चंद्राची ज्योत ॥ गगनीं चांदणी लखलखीत ॥ ऐका तिची मात ॥ मंथन करित

होती दारांत ॥ धरूनी कृष्णाचा हात ॥ ऐ-
शा आल्या त्या नटूनीं ॥ आल्या पांच गौ० ॥
॥ १ ॥ दुसरी गौळण भाळी भोळी ॥ हळदी-
हून पिंवळी ॥ पिंवळा पीतांबर नेसुनी आली ॥
आंगीं बुट्टेदार चोळी ॥ एक लहान तनु उ-
मर कवळी ॥ जसी चांप्याची कळी ॥ ऐशा
आल्या त्या नटोनी ॥ आल्या पांच० ॥२॥
तिसरी गौळण रंग काळा ॥ नेसुनीयां चंद्र-
कळा ॥ काळें काजळ लेवुनियां डोळां ॥ रंग
तिचा सांवळा ॥ काळी गरसोळी लेवुनियां
गळां ॥ आली राजसबाळा ॥ ऐशा आल्या
त्या नटोनी ॥ आल्या० ॥ ३ ॥ चवथी ग-
वळण रंग लाल ॥ लालीलाल हिंगूळ ॥ कपाळीं
कुंकुंचिरी रंग लाल ॥ भांगीं भरला गुलाल ॥
मुखीं विडा रंगला रंग लाल ॥ जसें डाळिंबाचें

फूल ॥ ऐशा आल्या त्या नटोनी ॥ आल्या० ॥ ४ ॥ पांचवी गौळण हिरवा रंग ॥ अवघ्या झाल्या दंग ॥ हिरव्या कंकणाचा पहा रंग ॥ आरशींत जडलें भिंग ॥ फुगडी खेळति कृष्णासंगें ॥ एकनाथ अभंग ॥ ऐशा आल्या त्या नटूनी ॥ आल्या पांच गौळणी ॥ ५ ॥

गोंधळ-पद ४ थें.

राजस सुंदर बाळा ॥ पाहों आलीया सकळा वो ॥ विंवीं बिंबोनी ठेली ॥ माझी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशींमाजी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ १ ॥ राजस विठाबाई ॥ माझें ध्यान तुझे पायीं वो ॥ त्यजुनीयां चौवींसी ॥ लावी आपुलिये सोई वो ॥ ध्रु० ॥ सकुमार साजिरी ॥ कैसीं पाउलें गोजिरीं वो ॥ कंठीं तुळशीमाळा ॥ उभी भिवरेच्या तिरीं वो ॥

दंत हिऱ्याज्योती ॥ शंखचक्र मिरवे करीं वो ॥ २ ॥ निर्गुण निराकार ॥ वेदां न कळेचि आकार वो ॥ शेषादिक श्रमले ॥ श्रुती नकळे तुझा पार वो ॥ उभारोनि बाहे ॥ भक्तां देत अभय कर वो ॥ ३ ॥ येउनि पंढरपुरा ॥ अवतरली सारंगधरा वो ॥ देखोनि भक्तिभाव ॥ वोसरली अमृतधारावो ॥ देउनि प्रेमपान्हा ॥ तुकयास्वामीनें किंकरा वो ॥ ४ ॥

पद ९ वें.

गुरुच्या वचनें मेलोंगा ॥ असत्य जीवें गेलोंगा ॥ १ ॥ मरोनि झालों पैं आह्मीं ॥ जिताची मेलों श्रीरामीं ॥ २ ॥ मीपण माझें हारपलें ॥ पूर्व अवघें पालटलें ॥ ३ ॥ केशव ह्मणे गुरुवचनीं ॥ समरस झालों चिद्गगनीं ॥ ४ ॥

मुंढा-पद ६ वें.

संबाल यारों उपर तलें दोन्हो मारकी चोट॥
नजर करे सोई राखे पश्चा जावे लूट ॥ १ ॥
प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ॥ ध्रु० ॥
रडे कुदे ढुंगन चावे आगल भुलन प्यार ॥
लडबड खडबड कांहे कांख चलावत भार ॥ २ ॥
कहे तुका चलो एक हम जिन्होके सात ॥
मिलावे तो उसे देना तोही चढावे हात ॥ ३ ॥

पद ७ वें.

हे खुण गुरु जाणे गुरु जाणे ॥ येरां टक-मकवाणें ॥ हे खुण ॥ ध्रु० ॥ निश्चळपणीं जो चाले॥ चालुनि निश्चळपण ज्या उमगलें ॥ १ ॥ हे खुण०॥ वेद मुक्यानें सांगे ॥ बोले त्याचे मौन न भंगे ॥ २ ॥ हे खुण० ॥ उद्धव-चिद्घन पाहे ॥ सगळा डोळा होउनि राहे ॥ ३ ॥ हे खुण गुरु जाणे० ॥

पद ७ वें.

मनुजा राम सखा करलेरे ॥ मनुजा राम सखा० ॥ ध्रु० ॥ खटपट छांडके पंथ गहो सुधा ॥ अलखा भुवन लखलेरे ॥ मनु० ॥ १ ॥ इस जुगमाही जगवा थोरा ॥ अजपाजप जप लेरे ॥ मनु० ॥ २ ॥ कहत मानपुरी दाव बनो है ॥ भवसागर तरलेरे ॥ मनुजा राम सखा करलेरे ॥ ३ ॥

अभंग ११ वा.

शैवमार्ग रुद्रतरु ॥ गेला भेदुन अपरंपारू ॥१॥ तीन शेंडे फांटे फुटला ॥ हाचि तरू विस्तारला ॥२॥ आणखी झाल्या शाका किती ॥ कोण करिल त्यांची गणती ॥ ३ ॥ वैष्णवमार्ग फांटा फुटला ॥ शेखीं मुळासीच आला ॥ ४ ॥ अनेक शाखा एक रूख ॥ हाची फु-

टला औघा एका ॥ ५ ॥ शिवदास ह्मणे फळ ॥ शिवें धरिलें आह्मीं मूळ ॥ ६ ॥

अभंग १२ वा.

शिवनामकीर्ती सदा चारी वेद ॥ वर्णिती सद्गद होवोनीयां ॥ १ ॥ साही शास्त्रें ज्याच्या नामीं परायण ॥ सदा गाती गुण तयाचेची ॥ २ ॥ अठराही पुराणें शिवलीला गाती ॥ ऐसा उमापती समर्थ जो ॥ ३ ॥ शिवदास ह्मणे त्याचें नाम वाचे ॥ घेतां मग कैंचें भवभय ॥ ४ ॥

अभंग १३ वा.

नामें कोळी उद्धरीला ॥ सम आला सत्यास ॥१॥ नामें तारिले अज्ञान ॥ भिल्लजनपशू ते ॥२॥ महानंदा उद्धरीली ॥ मुक्ती दिली भोळेसीं ॥ ३ ॥ व्याघ्र गज काय ज्ञानी ॥

घर्म आणी काढोनी ॥ ४ ॥ शिवदास नाम कंठीं ॥ दिली मिठी सुटेना ॥ ५ ॥

अभंग १४ वा.

शिववाचा बसवा शिव माझा धनी ॥ करीन पेरणी मृत्युलोकीं ॥ १ ॥ ज्ञानाचें शिवळ घेउनीयां खांदा ॥ ज्ञानभक्तीमध्यें वावरेना ॥ २ ॥ पीटवोनी काडी ऐसा नाहीं काळ ॥ खाईन सकळ माझा मीच ॥ ३ ॥ माझा मीच धनी मज कोण वारी ॥ शिंगनापूरद्वारीं बैसवीन ॥ ४ ॥ शिवदास ह्मणे सत्ताधारी एक ॥ दावीन कौतुक जगामध्यें ॥ ५ ॥

अभंग १५ वा.

शिवाचा मी नंदी शिव माझा धनी ॥ कृपा ते संतांनीं केली मज ॥ १ ॥ केली मज आतां अज्ञान अंधासी ॥ शिवनामराशी भा-

वीयेल्या ॥२॥ भावीयेल्या ऐसा धडा दिला त्यांनीं ॥ ह्मणुनी कृपादानीं झालों मीचि ॥ ३ ॥ केलें मज आतां झालों अनावर ॥ माझें मज घर दाखवीलें ॥४॥ दाखवीलें मज शिवदास ह्मणे ॥ संसारधरणें चुकवीलें ॥५॥

अभंग १६ वा.

सिंगनापूर सिंगनापूर ॥ जयजयकारें गर्जावें ॥१॥ सिंगनापूर नाम घेत ॥ नाहीं पंथ यमाचा ॥ २ ॥ सिंगनापूर जीवन्मुक्ति ॥ पाहती जाऊन आदरें ॥३॥ पाहतां कावडीचे ध्वज ॥ मुक्ती सहज जीवासी ॥ ४ ॥ शिवदासा नामछंद ॥ नाहीं बंध दूसरा ॥ ५ ॥

अभंग १७ रा.

येईं येईं शिवराया ॥ माझा दंडवत पायां ॥१॥ तुज केला म्यां नवस ॥ भेटी होईल

अनायास ॥ २ ॥ घेईं आपुला फेडूनी ॥ झालों होतों तुझा ऋणी ॥ ३ ॥ शिवदासह्मणे केला ॥ नवस सिंगनापुरीं दिला ॥ ४ ॥

अभंग १८ वा.

कर्म धर्म नव्हे पुरे ॥ उणे सरे पतनीं ॥१॥ ह्मणुनि घ्यारे शिवनाम ॥ जिंका धाम मोक्षाचें ॥ २ ॥ शिवनामाविणें रितें ॥ कांरे जिते जगलां ॥ ३ ॥ शिवदास ह्मणे संधी ॥ साधा आधीं एकांतीं ॥ ४ ॥

अभंग १९ वा.

बोलिलों तें तुह्मां उणें ॥ कीजे क्षमा नारायणें ॥१॥ आपुलिये मी तळमळें ॥ दुःखें चाळवलों तें कळे ॥२॥ समर्थांची गती मती ॥ कोण जाणे कैसी रीती ॥ ३ ॥ निळा ह्मणे उचित करा ॥ जैसे आपुले ते दातारा ॥ ४ ॥

अभंग २० वा.

मस्तक माझा पायावरीं ॥ राहो निरंतरीं संतांच्या ॥१॥ इतुकेन मी कृतकृत्य ॥ होईन निश्चित संसारीं॥२॥ धरिल्या जन्माचें सार्थक॥ भवभयमोचक साधन हें ॥ ३ ॥ निळा ह्मणे नलगे फार ॥ करणें विचार यावरी ॥ ४ ॥

पद—कावडे ९ वें.

आहारे भाई ॥ हें अन्नदानाचें सत्र ॥ पव्हें घातलीं सर्वत्र ॥ पंथीं अवघे पांथमात्र ॥ इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ॥ १ ॥ यावें तेणें घ्यावें ॥ न सरेसें केलें सदाशिवें ॥ पात्र शुद्ध पाहिजे बरवें ॥ मंगळ भावें सकळहि ह्मणारे ॥ २ ॥ नव्हे हें कांहीं मोकळें ॥ साक्षी चोघांचिया वेगळें ॥ नेदि नाचों मताचिया बळें ॥ अणु अणोरणीया आगळें ॥ महदि-महदा साक्षित्वें हरि ह्मणारे ॥ ३ ॥ हे हरि

नामाची आबिली ॥ जगा पोटभरी केली ॥ विश्रांति कल्पतरूची साउली ॥ सकळां वर्णां सेवितां भली ॥ ह्मणा हरहर महादेव ॥ ४ ॥ तुका हरिदास तराळ ॥ अवघे हाकारी सकळ ॥ यारे वंदूं शिखरतळ ॥ चैत्रमास पर्वकाळ महादेव दर्शनें ॥ ५ ॥

फुगडी. पद १० वें.

फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे ॥ लाज सांडोनि एक एकी पाहे ॥ ध्रु० ॥ फुगडीगे अवघे मोडीगे ॥ तरीच गोडीगे संसार तोडींगे ॥ १ ॥ मागें जें शिकली होतीस पोटीं ॥ तेंचि विचारूनि आतां उच्चारीं ओंठीं ॥ २ ॥ त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं ॥ सांवरूनि धरीं घालीं मूळ बंदीं गांठीं ॥ ३ ॥ आगळें पाऊल जिंके एकाएक ॥ पावसी

मान हे मानवती तिन्ही लोक ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुज मजमध्यें एकभाव ॥ समतुकें बार घेऊं पावों ऊंच ठाव ॥ ५ ॥

हमामा—पद ११ वें.

मशीं पोरा घेरे बार ॥ तुझें बुजीन खालिल द्वार ॥ पोरा हमामारे हमामारे ॥ १ ॥ ध्रु० ॥ मशीं हमामा तूं घालीं ॥ पोरा वरी सांभाळीं खालीं ॥ २ ॥ तरीच मशीं बोल ॥ पोरा जिव्हाळ्याची ओल ॥ ३ ॥ मशीं घेतां भास ॥ जीवा मीतूंपणाचा नास ॥ ४ ॥ मजसवें खरा ॥ पण जाऊं नेदी घरा ॥ ५ ॥ आमुचिये रंगीं ॥ दुजें तगेना ये संगीं ॥ ६ ॥ तुक्यासवें भास ॥ हरी जीवा करी नास ॥ ७ ॥

पद १२ वें.

तोंवरि हळहळरे हळहळरे ॥ नाहीं भक्ती-

बळरे ॥ तोंवरि ॥ ध्रु० ॥ उदंड करितो कर्मे ॥ चुकला ब्रह्मपणाचीं वर्मे ॥ तोंवरि० ॥ १ ॥ विवेक जागा करिना ॥ जोंवरी शांती दृढ जिवीं धरिना ॥ तोंव० ॥२॥ शिवदिन केसरि पायीं ॥ भावें शरण रिघाला नाहीं ॥ तोंव०॥३॥

पद १३ वें.

उसपर बल जैये ॥ प्रेम प्रीतिसें रहिये, उ० ॥ ध्रु० ॥ अलख पलखमो सारा ॥ सब घट देखें साई हमारा ॥ उसपर०॥ १ ॥ अजपाजप करता है ॥ कर बिन मन मनका फिरता है ॥ उसपर० ॥ २ ॥ आसककेसरि घरका ॥ शिवदिन बंदा उसके घरका ॥ उसपर बल जैये० ॥ ३ ॥

पद १४ वें.

लोभ हरीचा लटका, गे बाई लोभ० ॥ध्रु०॥

अक्रूर आला घेउनि गेला ॥ काळजाचा कुटका, गे बाई ॥ लोभ हरीचा ल० ॥ १ ॥ उद्धव शाह्याणा घेउनि आला ॥ कागदाचा कुटका, गे बाई ॥ लोभ हरीचा ल० ॥ २ ॥ कुब्जा दासी केली पट्टराणी ॥ कैशी होईल सुटका, गे बाई ॥ लोभ हरीचा० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर स्वामी रमापति ॥ तोडुनि गेला तुटका, गे बाई ॥ लोभ हरीचा० ॥ ४ ॥

पद १९ वें.

इतरें साधन कां साधन कां ॥ काय ह्मणावें लोकां ॥ ध्रु० ॥ पाय गुरूचे ध्यातां सद्रुपदची आलें हाता ॥ इतरें० ॥ १ ॥ भरुनी तेल दिवटी लाविति भानु पाहायासाठीं ॥ इतरें० ॥ २ ॥ शिव होणें शिव भजणें उद्धव चिद्घनिं हे स्थिति बाणे ॥ इतरें० ॥ ३ ॥

# भजनी मंडळी.

## दुसरी.

## बारी २ री.

### अभंग. १ ला.

( चालीला चाल व तोड. )

बहुजन्में केला लाग ॥ तोहा भाग लाधलों ॥१॥ जीव देईन हा बळी ॥ करिन होळी संसारा ॥ २ ॥ गेलें मग नये हाता ॥ पुढती चिंता वाटतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तांतड करूं ॥ पाय धरूं बळकट ॥ ४ ॥

### अभंग २ रा.

( चालीला चाल व तोड. )

प्रथम भाव शुद्ध करा ॥ अंगीं वैराग्यातें

भरा॥ भक्ति पाहिजे शिरजोर ॥ याहुनि योग कोणता ॥१॥ नको त्यजूं स्त्रिया पोर ॥ बाधी सोपे माझ्या घर ॥ आल्या अतिथा आदर ॥ याहुनि धर्म कोणता ॥ २ ॥ करी नामाचा गजर॥ जाणे संताची कदर॥ तुका ह्मणे तोचि नर ॥ ब्रह्मज्ञानी पुरता ॥ ३ ॥

अभंग ३ रा.

( चालीला चाल व तोड. )

पंढरीची वारी आहे माझ्या घरीं ॥ आणीक न करीं तीर्थव्रत ॥ १ ॥ व्रत एकादशी करीन उपवासी ॥ गाईन अहर्निशीं मुखीं नाम ॥ २ ॥ नाम विठोबाचें घेईन मी वाचे ॥ बीज कल्पांतींचें तुका ह्मणे ॥ ३ ॥

अभंग ४ था.

( चालीला चाल व तोड. )

धन्य धन्य पंढरपूर ॥ उभा रखुमाईचा वर

॥१॥ वाहे भीमा चंद्रभागा ॥ काशी गया ते
प्रयागा ॥ २ ॥ सत्यपुरी ती द्वारका ॥ उभा
पांडवांचा सखा ॥३॥ तुका ह्मणे पुंडलीका ॥
धन्य भक्त तूंचि निका ॥ ४ ॥

अभंग ५ वा.

( चालीला चाल व तोड. )

दुर्जनांचा संग आगीचें तें झाड ॥ अंगा
येती फोड लागतांचि ॥ १ ॥ काय लाभ
त्याचे शेजे बैसायाचा ॥ वीट या देहाचा कां
करावा ॥ २ ॥ गूळ टाकोनियां वृंदावन खावें॥
ऐसें कां करावें तुका ह्मणे ॥ ३ ॥

अभंग ६ वा.

( चालीला चाल व तोड. )

अहो देवा कृपावंता ॥ करा मज अनथा
सनाथ ॥ १ ॥ निरउनियां संतजनां ॥ करा

मना बोध माझ्या ॥ २ ॥ अरुष वाणी बो-
बडीं वचनें ॥ केलीं स्तवनें परिसावीं ॥ ३ ॥
निळा ह्मणे आवडी जाणा ॥ करीं विज्ञापना
ह्मणउनी ॥ ४ ॥

अभंग ७ वा.

( चालीला चाल व तोड. )

आवडोनि रूप मनीं ॥ धरिलें वदनीं ह-
रिनाम ॥१॥ नलगे आणिक कांहीं चिंता ॥
गोडचि आतां यावरी ॥ २ ॥ काय करूं ते
आसन मुद्रा ॥ कृपासमुद्रा तुजविण ॥ ३ ॥
निळा ह्मणे दिधलें संतीं ॥ नाम एकांतीं
तेंचि गोड ॥ ४ ॥

अभंग ८ वा.

( चालीला चाल व तोड. )

अरे अरे ज्ञाना झालासी पावन ॥ तुझें

तुज ध्यान कळोंआलें ॥ १ ॥ तुझा तूंचि देव तुझा तूंचि भाव ॥ फिटला संदेह अनन्य तत्वीं ॥ ध्रु० ॥ मुरडूनियां उमजलासी चित्तें॥ कोठें तुज रितें नदिसे राया ॥ २ ॥ दीपकीं दीपक मांवळल्या ज्योती ॥ घरभरी वाती शून्य झाल्या ॥ ३ ॥ वृत्तीची निवृत्ती आपणासकट ॥ अवघेंचि वैकुंठ चतुर्भुज ॥ ४ ॥ निवृत्तिपरमा अनुभव नेमा ॥ शांती पूर्ण क्षमा ज्ञानदेवो ॥ ५ ॥

अभंग ९ वा.

( चालीला चाल व तोड. )

रामनाम पिके वाणी ॥ कथन केलें वाल्मीकांनीं ॥ १ ॥ रामायण शतकोटी ॥ जगा वांटी धूर्जटी ॥ २ ॥ रामनाम दोन

अक्षरें ॥ कंठी धरिलीं शंकरें ॥ ३ ॥ शिवदास नाम भूवरी ॥ आमोद चाखीतो कल्हारी ॥ ४ ॥

अभंग १० वा.

( चालीला चाल व तोड. )

माझे गडी मज भेटा ॥ मग वाटा अवघे ते ॥ १ ॥ आमचे खेळा येइल कोणी ॥ घ्यारे बांधोनी त्याजपासीं ॥ २ ॥ खेळ टाकुन येइल रडी ॥ ऐसा गडी नलगे तो ॥ ३ ॥ टाळी देऊन धरी सुर ॥ ऐसा धीर तेचि यारे ॥ ४ ॥ शिवदासें धरली पाटी ॥ गेला शेवटीं निघोनी ॥ ५ ॥

पद १ लें.

( चालीला चाल. )

गुरूनें कृपा केलीगा ॥ चिंता ममता गेलीगा ॥ १ ॥ अवघा भासे आनंदू ॥ अवलो-

कितां गोविंदू ॥ २ ॥ देहबुद्धी गेली लया ॥ मिळणी होतां चिन्मया ॥ ३ ॥ केशव ह्मणे गुरुकृपा ॥ ऐक्य झालें स्वरूपा ॥ ४ ॥

पद २ रें.

( चालीला चाल व तोड. )

आतां मी नाहीं मी नाहीं ॥ नरहरिवांचुनि पाहीं ॥ ध्रु० ॥ अनुभव पाउल वाटे ॥ जीविंचें जीवन नरहरि भेटे ॥ आतां मी ना० ॥ १ ॥ विकल्प अवघा सरला ॥ दोन्हीं डोळां नरहरि भरला ॥ आतां ॥ २ ॥ शिवदिन पण हें हरलें ॥ केशरी गुरुनें नरहरि केलें ॥ आतां० ॥ ३ ॥

गौळण-पद ३ रें.

( ३ ऱ्या पदाची तोड. )

गौळणी ठकविल्या गौळणी ठकविल्या ॥ एक एक संगतिन मराठी कानडिया ॥ एक

मुसलमानी, कोकण गुजरणी ॥ अशा पांचीजणी, गौळणी ठकविल्या ॥ ध्रु० ॥ गौळणी सुंदरी, गौळणी सुंदरी ॥ गेल्या यमुनेतीरीं ॥ वस्त्रें फेडुनियां स्नान करिती नारी ॥ गोविंदानें वस्त्रें, नेलीं कळंबावरी ॥ स्नान करूनियां, त्या आल्या बाहेरी ॥ गौळणी ठकविल्या ॥ १ ॥ लाडोबा गोविंदा, लाडोबा गोविंदा ॥ निर्वाणी आज ॥ अडचल्लो पडचल्लो ॥ शीरफोड्या न फोडो ॥ मारी कन्हैया ॥ पामी खेळ्यान खेळों गौळणी ॥ २ ॥ देखरे कन्हैया ॥ देख० ॥ मैजातकी बडी ॥ कदम पकडुंगी मैयाकुटो झुडी, मेरी चुनरीदे ॥ मेरी ले दुलडी ॥ गौ० ॥ ३ ॥ देवकीनंदना ॥ देव० ॥ तूं एक श्रीपती ॥ उघडी हिंवाची ॥ तुज विनवूं किती ॥ पायां पडतो बा मी येतें काकुळती ॥ माझी

साडी दे ॥ घे नाकाचें मोतीं ॥ गौळणी०॥४॥ पावगा दातारा ॥ पाव० ॥ तूं नंदाचो झिलो ॥ माका फडको दी ॥ मी हिंवान मेल्य ॥ घी माझो कोयतो ॥ देवा पायां पडतय ॥ गौळणी० ॥ ५ ॥ ज्यो रे माधवजी ॥ ज्यो० ॥ मे शरण भई ॥ तनका काकैफी ॥ बाप दयाळ तूंही ॥ मारी साडी आपो ॥ हातनी ले कंगणी ॥ गौळणी० ॥ ६ ॥ इतुकें ऐकुनि ॥ इतुकें० ॥ देव बोले हांसोनी ॥ सूर्या दंडवत ॥ करा कर जोडुनी ॥ नामा विनवितो ह्मणे सारंगपाणी ॥ गौळ्या ऐक तूं ॥ धन्य तुझी करणी ॥ गौळणी० ॥ ७ ॥

गोंधळ-पद ४ थें.

( चालीला चाल व तोड. )

सुंदर मुख साजिरें ॥ कुंडलें मनोहर गो-

मटीं वो ॥ नागर नागखोपा ॥ केशर कस्तूरी मळवटी वो ॥ विशाळ व्यंकट नेत्रा ॥ वैजयंती तळपे कंठीं वो ॥ कास पीतांबराची ॥ चंदनसुगंध साजे उटी वो ॥ १ ॥ अति बरवंटा बाळा ॥ आली सुलक्षणीं गोंधळा वो ॥ राजस तेजोराशी ॥ मिरवी शिरोमणी वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशि ॥ प्रभा लोपल्या सकळा वो ॥ न कळे ब्रह्मादिकां ॥ अनुपम्य इची लीळा वो ॥ ध्रु० ॥ सांवळी सकुमार ॥ गोरी भुजा शोभती चारी वो ॥ सखोल वक्षस्थळ ॥ सुढाळ पदक झळके वरी वो ॥ कटीं क्षुद्र घंटिका ॥ शब्द करितातीं माधुरी वो ॥ गर्जत चरणीं वाकी ॥ अभिनव संगीत नृत्य करीं वो ॥ २ ॥ अष्टांगें मंडित काय ॥ वर्णावी रूप ठेवणी वो ॥ शोधिव सुंदर रासची

ओतिली ॥ सुगंध लावण्यखाणी वो ॥ सर्व कळासंपन्न ॥ मंजुळ बोले हास्य वदनीं वो ॥ बहुरूपें नटली ॥ आदिशक्ति नारायणी वो ॥ ३ ॥ घटस्थापना केली ॥ पंढरपुर महानगरीं वो ॥ अस्मानी मंडप दिला ॥ तिन्ही तालांवरी वो ॥ आरंभिला गोंधळ हिनें ॥ चंद्रभागेतिरीं वो ॥ आली भक्तिकाजा ॥ कृष्णाबाई योगेश्वरी वो ॥ तेहतीस कोटि देव ॥ चामुंडा अष्टकोटि भैरव वो ॥ आरत्या कुरवंड्या ॥ करिती पुष्पांचा वरुषाव वो ॥ नारद तुंबर गायन ॥ ब्रह्मानंद करिती गंधर्व वो ॥ वंदी चरणरज तेथें ॥ तुकयाचा बंधव वो ॥४॥

पद ९ वें.

( चालीला चाल व तोंड. )

सद्गुरुह्रदयीं भरलागा ॥ मनोरथ माझा पुर-

लागा ॥ रतलों तरलों जें आह्मीं ॥ जिताची मुक्त गुरुरामीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ पहातां गुरुचें निजरूप ॥ सबाह्य झालों सुखरूप ॥ २ ॥ केशव ह्मणे गुरु-भक्ती ॥ पायां लागति निजमुक्ति ॥ ३ ॥

मुंढा-पद ६ वें.

( चालीला चाल व तोड. )

सबसंबाल भ्यानें लैंडे खडाकेंऊ गुंग ॥ मदिरया महा हुवा भुलि पाडि भंग ॥ १ ॥ आपसकु संबाल आपसकु संबाल ॥ मुंढे खुब राख ताल ॥ मुथि वोहि बोला नहीं तो क-रूंगा हाल ॥ ध्रु० ॥ अवलका तो पिछे नहीं मुद्दल विसर जाय ॥ फिर ते नहीं लाज रंडी गथे गोते खाय ॥ २ ॥ जिन्हो खातिर इतना होता सो नहीं तुझे बेफाम ॥ उचाजोरो लिया तुंबा तुंबा बुरा काम ॥ ३ ॥ निकल जावे

चिकल जोरो मुंढे दिलदारी ॥ जबानिकी छोडदे बात फिर एक तारी ॥ ४ ॥ कहे तुका फिसाल रुका मेरेको दान देख ॥ पकड धका गांड गुडघी मार चलाऊं आलेख ॥ ५ ॥

पद ७ वें.

( चालीला चाल व तोड. )

गुरु हें समजावी समजावी ॥ त्यां नाहीं भव गोवी ॥ गुरु हें० ॥ ध्रु० ॥ दिसतांचि जळगारा ॥ तैसा ब्रह्मचि विश्व उभारा ॥ १ ॥ गुरु हें० ॥ लवणाची मासोळी ॥ कैसी वांचे उदकस्थळीं ॥ ॥ २ ॥ गुरु हें० ॥ उद्भव चिद्धन माया ॥ न येंचि कवणाही परियाया ॥ ३ ॥ गुरु हें० ॥

पद ८ वें.

( चालीला चाल. )

तीरथ कोन करे हमारो ॥ ध्रु० ॥ मनमें गं-

गा मनमें काशी ॥ मनमें स्नान करे हमारो ॥ तीरथ० ॥ १ ॥ मनमें आसन मनमें कडासन ॥ मनमें मौन धरे हमारो तीरथ० ॥२॥ मनमें माला मनमें मुद्रा ॥ मनमें ध्यान धरे हमारो ॥ तीरथ० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुन भइ साधो ॥ भटकत कोन फिरे ॥ ह० ॥ ४ ॥

अभंग ११ वा.

( चालीला चाल व तोड. )

शैवमार्ग हाची हीरा ॥ मस्तकीं शोभे खोंवा तुरा ॥ १ ॥ शैवमार्ग पाच नीळा ॥ कंठीं घाला त्याची माळा ॥ २ ॥ शैवमार्ग दिव्यमणी ॥ शोभे घाला आपुले कानीं ॥३॥ शैवमार्ग हेंचि रत्न ॥ जतन करा बहु प्रयत्न ॥ ४ ॥ शिवदास शिवभक्ता नित्य खालवी तो माथा ॥ ५ ॥

अभंग १२ वा.

( चालीला चाल व तोड. )

शिवनाम पाठ ज्या नरा सर्वदा ॥ समाधिस्थ सदा जाणावा तो ॥ १ ॥ निर्गुण समाधी साधितां कठिण ॥ अतां वरमन होय तेथें ॥ २ ॥ शिवाचे स्मरणें शिवरूप मन ॥ अनायासें जाण होत असे ॥ ३ ॥ शिवदास ह्मणे भृंगी कीटन्यायें ॥ शिवरूप होय निश्चयेंसी ॥ ४ ॥

अभंग १३ वा.

( चालीला चाल व तोड. )

नामें ज्ञान उजळलें ॥ शून्य आलें आकारा ॥ १ ॥ नामें ध्वुनी घटा नाद ॥ वाद्य भेद दावीला ॥२॥ नामें नभीं शब्द आला ॥ सामावला पोकळी ॥ ३ ॥ नामें आकार पं-

चभूता ॥ अवघी सत्ता नामाची ॥ ४ ॥ शिवदास ह्मणे तरा ॥ चित्तीं धरा शिवनाम ॥ ५ ॥

अभंग १४ वा.

( चालीला चाल व तोड. )

शिवाचा बसवा शीव माझा धनी ॥ संतानी दावणी बांधीयेली ॥ १ ॥ मारका स्वभाव होता बहु माझा ॥ ह्मणोनियां काजा आन झालों ॥२॥ माझा मी चुकलों आलों आना ठांईं ॥ मागील अपाई करोनीयां ॥ ३ ॥ शिवदास ह्मणे शिव हा कैवारी ॥ बांधियेले द्वारीं आकळोनी ॥ ४ ॥

अभंग १५ वा.

( चालीला चाल व तोड. )

शिवाचा मी नंदी आनंदें आनंदीं ॥ पंचवी-

सांची मादी वीचळली ॥ १ ॥ वीचळलें मन झालें शून्याकार ॥ सरिता भिन्नाकार येकार्णवीं ॥ २ ॥ एकार्णव झाला शून्यलिंगाकार ॥ जग हा आकार तेथें नाहीं ॥ ३ ॥ नाहीं असा संशय मनासीं उठला ॥ द्वैताचा हा घाला नाहीं तेथें ॥ ४ ॥ शिवदास ह्मणे बोधासीं बोधिला चंद्रमा धूतला क्षीरार्णवीं ॥ ५ ॥

अभंग १६ वा.

( चालीला चाल व तोड. )

सिंगनापूर सिंगनापूर ॥ शिवरायाचें नगर ॥ १ ॥ बहुता डोंगरांचा वेढा ॥ मध्यें सिंगनापूर चाहुडा ॥ २ ॥ घस्त हिंडे कावड्यांची ॥ ध्वनी होती मृदंगाची ॥ ३ ॥ ऐसें

सत्य नाहीं स्थळ ॥ कोठें धुंडीतां वेगळ ॥४॥
शिवदास तयाठाई ॥ भेटी झाली संतांपाई॥५॥

अभंग १७ वा.

( चालीला चाल व तोड. )

येईं येईं का धांवत ॥ माझें करावया हि-
त ॥ १ ॥ आह्मा करीसी जतन ॥ तरी तुज
देवपण ॥ २ ॥ नित्य राखी आमची लाज ॥
तरी तुझी खरी पैज ॥ ३ ॥ शिवदास ह्मणे
वृंदा ॥ नाहीं तर तोडून टाकी ब्रीदा ॥ ४ ॥

अभंग १८ वा.

( चालीला चाल व तोड. )

कर्म धर्म हेंची सार ॥ उतरे पार भवसिंधु
॥१॥ कर्म धर्म विणें जीणें ॥ लाजीरवाणें त-
यासी ॥ २ ॥ कर्मधर्माविणें पडेरे ॥ किती
घेरे घ्यावेत ॥ ३ ॥ कर्म धर्म घ्यावें हातीं ॥

चला पंथीं मोक्षाच्या ॥ ४ ॥ शिवदास ह्मणे धर्म ॥ ध्यारे नाम शिवाचें ॥ ५ ॥

अभंग १९ वा.

( चालीला चाल व तोड )

बोलीलों तें क्षमा करा ॥ विश्वंभरा अपराध ॥ १ ॥ सेवकांनीं कीजे सेवा ॥ तुह्मी तों देवा देवोचि ॥ २ ॥ चावळलों ते सलगी केली ॥ उपसाहिली पाहिजे ॥ ३ ॥ निळा ह्मणे न कळे लीला ॥ अकळकळा तुमची ते ॥ ४ ॥

अभंग २० वा.

( चालीला चाल व तोड. )

मस्तक माझा पायांवरी ॥ या वारकरी संतांच्या ॥ १ ॥ प्रतिवर्षीं पंढरपुरा ॥ जाती महाद्वारा हरिभेटी ॥ २ ॥ भेटी त्यांची इ-

च्छी मन ॥ करिती कीर्तन अनुदिनीं ॥३॥
निळा ह्मणे लोटांगण ॥ घालित जाईन
सामोरा ॥ ४ ॥

कावडे पद ९ वें

( चालीला चाल व तोड. )

आहारे भाई ॥ गंगा नव्हे जळ ॥ वृक्ष नव्हे
वड पिंपळ ॥ तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ ॥ श्रेष्ठ-
तनु देवाचीया ॥ १ ॥ समुद्र नदी नव्हे पैंगा ॥
पाषाण ह्मणों नये लिंगा ॥ संत नव्हती जगा ॥
मानसा त्या सारिखे ॥ २ ॥ काठी ह्मणूं नये
वेतु ॥ अन्न ह्मणों नये सातु ॥ राम राम हे
मातु ॥ नये ह्मणों शब्द हे ॥३॥ चंद्रसूर्य न-
व्हती तारागणें ॥ मेरु तो नव्हे पर्वतासमा-
न ॥ शेष वासुकी नव्हे सर्प जाण ॥ वि-
खाराच्या सारिखे ॥ ४ ॥ गरूड नव्हे पांखरूं ॥

ढोर नव्हे नंदिकेश्वरू ॥ झाड नव्हे कल्पतरू ॥
कामधेनू गाय न ह्मणावी ॥ ५ ॥ कूर्म नव्हे
कांसव ॥ डुकर नव्हे वराह ॥ ब्रह्मा नव्हे जीव ॥
स्त्री नव्हे लक्ष्मी ॥ ६ ॥ गवाक्ष नव्हे हाड ॥
पाटाव नव्हे कापड ॥ परीस नव्हे दगड ॥ सगुण
ते ईश्वरींचे ॥ ७ ॥ सोनें नव्हे धातु ॥ मीठ नव्हे
रेतु ॥ नाहीं नाहीं चर्मांतु ॥ कृष्णाजीन
व्याघ्रांबर ॥ ८ ॥ मुक्ताफळें नव्हेति गारा ॥
खड्या ऐसा नव्हे हिरा ॥ जीव नव्हे सोइरा ॥
बोलविजे स्वइच्छेनें ॥ ९ ॥ गांव नव्हे द्वाराव-
ती ॥ रणछोड नव्हे मूर्ति ॥ तीर्थ नव्हे गोम-
ती ॥ मोक्ष घडे दर्शनें ॥ १० ॥ कृष्ण नव्हे भो-
गी ॥ शंकर नव्हे जोगी ॥ तुका पांडुरंगीं ॥
हा प्रसाद लाधला ॥ ११ ॥

### फुगडी–पद १० वें.

( चालीला चाल व तोड. )

फुगडी फू सवती माझें तूं ॥ हायुनी भरलें थू ॥ तुझ्या ढुंगा तोंडावरि थू ॥ ध्रु० ॥ फुगडी घेतां आली हारी ॥ ऊठ जावो जग नोवरी ॥ १ ॥ हातपाय बेंबळ जाती ॥ ढुंगण घोळितां लागे माती ॥ २ ॥ सात पांच आणिल्या हारी ॥ वांचूनी काय तगसी पोरी ॥ ३ ॥ सरला दम पांगले पाय ॥ आझुनि बरी घोळसी काय ॥ ४ ॥ तुका ह्मणे आझुन तरी ॥ सांगितलें तें गधडी करी ॥ ५ ॥

### हमामा–पद ११ वें.

( तोड. )

हमामारे पोरा हमामा रे ॥ हमामा घालितां ठकलें पोर ॥ करी येरझार चौऱ्यांशींची

॥ ध्रु० ॥ पहिले पहारा रंगासि आलें ॥ सोहं सोहंसें बार घेतलें ॥ देखोनी गडी ते विसरले ॥ डाई पडिले आपणचि ॥ १ ॥ दुसऱ्या पहरा महा आनंदें ॥ हमामा घाली छंदछंदें ॥ दिसवाटे तो गोड वाटे ॥ परि पुढें नेणें पोर काय होतें तें ॥ २ ॥ तिसऱ्या पहरा घेतला बार ॥ अहंपणें पाय न राहे स्थिर ॥ सोस करितां ठाईं पडसी ॥ सत्य जाणें हा निर्धार ॥ ३ ॥ चौथ्या पहरा हमामा ॥ घालिसी कांपविसी हातपाय ॥ सुऱ्या पाटिलाचा पोर यम ॥ त्याचे पडसील डायीं ॥ ४ ॥ हमामा घालितां भ्याला तुका ॥ त्यानें सांडिली गड्याची सोई ॥ यादवांचा मूल एक विठोबा ॥ त्यासवें चारितो गाई ॥ ५ ॥

पद १२ वें.

( चालीला चाल वं तोड )

तैसें जग नाना जग नाना ॥ आत्मा एकचि जाणा ॥ तैसें० ॥ ध्रु० ॥ नाना प्रतिबिंबांचा ॥ परि तो धातु एकचि साचा ॥ तैसें ज० ॥ १ ॥ उदंड शाखा पानें ॥ परि तो एक तरु अभिधानें ॥ तैसें० ॥ २ ॥ अपार जंळधरधारा ॥ उद्धवचिद्घन तोय विचारा ॥ तैसें जग नाना जग० ॥ ३ ॥

पद १३ वें.

( चालीला चाल व तोड )

अवघें शिवमय कीं ॥ लागुनि गेलें लय कीं ॥ ध्रु० ॥ द्वैतभाव दुर गेला ॥ भावेंचा अन्वय शब्द बुडाला ॥ अवघें० ॥ १ ॥ सबाह्य शिवपण मुद्रा ॥ जैसें प्रळयीं उदक समुद्रा ॥

अवघें शिव० ॥ २ ॥ शिव शिव शिव दिन गात ॥ सद्गुरु केशरि कनक नगांत ॥ अवघें शिवमय कीं ॥ ३ ॥

पद १४ वें.

( चालीला चाल व तोड. )

मनमोहन वाजवी वेणुरे ॥ मनमोहन० ॥ ॥ ध्रु० ॥ कुंजवनीं ध्वनि ऐकुनि कानीं ॥ मोहित झाल्या धेनूरे ॥ मनमोहन० ॥ १ ॥ रंजविल्या व्रजसुंदरी सर्वहि ॥ पार तयाचा नेणूरे ॥ मनमोहन० ॥ २ ॥ कल्पद्रुमातळीं मध्वमुनिश्वर ॥ वंदि पदांबुजरेणुरे ॥ म० ॥६॥

पद १५ वें.

( चालीला चाल व तोड. )

तें मज निज कळलें निज कळलें ॥ गुरुनीं हाता धरिलें ॥ तें० ॥ ध्रु० ॥ कोण मी कोण्या

काजा ॥ कोठुनि आलों सद्गुरुराजा ॥ तें० ॥
॥ १ ॥ जाणें कवण्या ठाया ॥ कोठुनि उ-
द्भव सरली माया ॥ तें० ॥ २ ॥ वेद मु-
कले सांगे ॥ झाला उद्धवचिद्घन आंगें ॥
तें मज० ॥ ३ ॥

# भजनी मंडळी.

## पहिली.

## बारी ३ री.

### अभंग १ ला.

माझिये मनीं विश्रांति वाटे ॥ देखता गोमटे ईटे चरण ॥ १ ॥ तुळशीमाळा शोभल्या कंठीं ॥ प्रकाश मुगुटीं रत्नांच्या ॥ २ ॥ कुंडलांचें दीप्तीझळाळ ॥ शोभलें निढळ बुक्यानें ॥ ३ ॥ निळा ह्मणे आंगिंचे कांति ॥ सूर्यादी लोपती शशिमंडळें ॥ ४ ॥

### अभंग २ रा.

येती जाती वर्षती मेघ ॥ गगन तें अभंग

जैसें तैसें ॥ १ ॥ तैसींच ब्रह्मांडें अनेक होती जाती ॥ स्वरूपतें अद्वैतीं अद्वैत ॥ २ ॥ नाना नटिया नटवेष ॥ परि तो आपणांस भिन्न नव्हे ॥ ३ ॥ निळा ह्मणे नाना वस्त्राकार तंतु ॥ दाउनी आपणा तुं आपणा ॥ ४ ॥

अभंग ३ रा.

विठ्ठल विठ्ठल वदतां वाणी ॥ चक्रपाणी संतोषे ॥ १ ॥ ह्मणोनियां लाहो करा ॥ अहो अवधारा अवघेही ॥ २ ॥ येणेंचि नामें वैकुंठासी ॥ गेले पापराशी बहु मागें ॥ ३ ॥ निळा ह्मणे सांगती संत ॥ उभवुनी हात पुराणांतरीं ॥ ४ ॥

अभंग ४ था.

सांगों जातां शब्दचि विरे ॥ जेंवि अंधारे रविभेटी ॥ १ ॥ सागरीं ठाव बुडीही देतां ॥

नलभेचि सर्वथा निर्बुजला ॥ २ ॥ यापरि शब्द न पवेचि तेथें ॥ कैसेनि सुखातें अनुवादों ॥ २ ॥ निळा ह्मणे जाणती संत ॥ आहे सिद्धांत तेथींचा तो ॥ ४ ॥

अभंग ५ वा.

सकुमार साकर कापुरें घोळिली ॥ गोडी परिमळु दोन्ही उरलीं ॥ १ ॥ मित्रत्व करा जीवाहूनि वेगळें ॥ पढियंतें आगळें प्रेम जाण ध्रु० ॥ तरूमाजी जैसा एक चंदनु ॥ राहीला वेधून वनस्पती ॥ २ ॥ बाप रखुमादेवीवरू जिवींचा जिव्हाळा ॥ कांहीं केलिया वेगळा न्हवेगे माये ॥ ३ ॥

अभंग ६ वा.

एकी ह्मणे ग्रह दुजी ह्मणे मोहो ॥ एकीनें सोहं सांगितलें ॥ १ ॥ कोहंवाची वारी

सोहंमतें सारी ॥ वैकुंठींची दरी उघडली ॥ ध्रु० ॥ ककार भेदीला मकार शोधीला ॥ ॐकार निमाला तये स्थानीं ॥२ ॥ ज्ञानदेवीं ओहुं सोहं गिळिलें पैं कांहें ॥ नाहीं आह्मां मोह कल्पनेचा ॥ ३ ॥

अभंग ७ वा.

त्रिभुवनींचें सुख पहावया नयनीं ॥ दिनरात्री धणी न पुरे माझी ॥ विटेवरी सांवळा पाहतां डोळां ॥ मन वेळोवेळां आठवितु ॥ ध्रु० ॥ सागरिं भरितें दाटे तैसें मन नटे ॥ वाट पाहों कोठें तुझी राया ॥ २ ॥ बाप रखुमादेवीवरू पूर्ण प्रकाशला ॥ कुमुदिनीं विकासला तैसें झालें ॥ ३ ॥

अभंग ८ वा.

एकेंवीण दुजें तत्व नाहीं पैं सृष्टीं ॥ वि-

श्वरूपें भेटी अर्जुनासी ॥ १ ॥ त्यारूपें वेधि-
लें काय करूं सये ॥ एकरूप होय कृष्णराजा
॥ ध्रु० ॥ न दिसे पैं द्वैत अद्वैत श्रीहरी ॥
अवघा घरोघरीं हरि नांदे ॥ २ ॥ निवृत्ती प-
रिवार एक तत्त्व दिवटा ॥ एक्या रूपें वैकुंठा
नेतु असे ॥ ३ ॥

अभंग ९ वा.

हरिवीण दैवत नाहीं पैं अनुचित्तीं ॥ अ-
खंड श्रीपतिनाम वाचे ॥ रामकृष्ण मूर्ति
या जप आवृत्ति ॥ नित्य नामें तृप्ती झाली
आह्मां ॥ ध्रु० ॥ नामाचेनि स्मरणें नित्य पैं
सुस्नात ॥ दुजियाची मात नेणों आह्मीं
॥ २ ॥ निवृत्ति जपतु अखंड नामावळी ॥
हृदयकमळीं केशीराजा ॥ ३ ॥

अभंग १० वा.

निळिये मंडळीं नीळवर्ण सांवळी ॥ तेथें वेधलासे बाळी ध्यानरूप ॥ १ ॥ वेधु वेधला निळा पाहे घननिळा ॥ विरहणी केवळा रंग रसनें ॥ ध्रु० ॥ नीळ वर्ण अंभ नीळवर्ण स्वयंभ ॥ वेधें वेधु नलभे वैकुंठींचा ॥ २ ॥ ज्ञानदेव निळीं हृदयीं सांवळी ॥ प्रेमरसें कल्लोळीं बुडी देत ॥ ३ ॥

पद १ लें.

अशाला आशा नाचविते ॥ ध्रु० ॥ याविषयीं धरी धांविन्नली मति ॥ लावि मना चवि ते ॥ अशाला० ॥ १ ॥ निष्कटपणास्तव शुष्कपणें गिरा ॥ शुष्कवनाचविते ॥ अशाला० ॥ १ ॥ आनंदात्मज बोले भावें ॥ बुद्धी नाचविते॥ अशाला आशा नाचविते॥२॥

पद २ रें.

नेऊं नको यदुवीर अक्रुरा० ॥ ध्रु० ॥ नंद यशोमति भाकिति करुणा ॥ बाल्यदशा नाहिं थोर ॥ अक्रुरा नेऊं० ॥१॥ कंस दुरात्मा निशिदिनिं जपतो ॥ घातकि तो निष्ठूर ॥ अक्रुरा नेऊं० ॥ २ ॥ गोपी मिळूनि बोलति अवघ्या ॥ करिं एवढा उपकार ॥ अक्रुरा नेऊं० ॥ ३ ॥ अक्रुर नाम तुझें जगीं बोलती ॥ परि करणी दिसे क्रूर ॥ अक्रुरा नेऊं० ॥ ४ ॥ गोपी विरहें व्याकुळ बोलति॥नयनीं झिरपत नीर ॥ अक्रुरा नेऊं० ॥ ५ ॥ अमृतमतीनें पाहुनि अक्रुर ॥ सप्रेमें बैसला स्थीर ॥ अक्रुरा नेऊं नको यदुवी० ॥ ६ ॥

पद ३ रें.

देरे हरि संतपदाची जोड ॥ ध्रु० ॥ संत-

समागमें आत्मत्वाचा उगवे सुंदर मोड ॥ देरे हरि सं० ॥ १ ॥ सफलित करुनी पूर्ण मनाचें ॥ पुरवित सर्वहि कोड ॥ देरे हरि सं० ॥२॥ अमृत चिंतित हरिभक्तांचा ॥ शेवट करिसी गोड ॥ देरे हरि संतपदाची जोड० ॥ ३ ॥

पद ४ थें.

अशी ही थट्टा ॥ भलभल्यासी लाविला बट्टा ॥ ध्रु०॥ थट्टा गेली शंभूपाशीं ॥ कलंक लाविला चंद्रासी ॥ भगें पडलीं इंद्रासी ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भलभल्यासी लाविला बट्टा ॥१॥ थट्टेनें मेला दुर्योधन ॥ भस्मासुर गेला भस्म होऊन ॥ वाळीही मुकला आपुल्या प्राणा ॥ अशी ही थट्टा ॥२॥ थट्टा रावणानें केली ॥ नगरी सोन्याची बुडविली ॥ थट्टा ज्याची त्यास

भोंवली ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भ० ॥ ३ ॥ अ-
रण्यांत होता भृगुऋषी ॥ थट्टा गेली त्याचेपा-
शीं ॥ भुलवुनि आणिला अयोध्येसी ॥ बरी
नव्हे थट्टा ॥ ४ ॥ विराटराजाचा मेहुणा ॥
नाम तयाचें कीचक जाणा ॥ त्याणें घेतले ब-
हुतांचे प्राणा ॥ बरी० ॥ ५ ॥ थट्टेपासून सु-
टले चौघेजण ॥ शुक भीष्म आणि हनुमान ॥
चौथा कार्तिकस्वामी जाण ॥ त्यांना नाहीं
बट्टा ॥ अशी ही थट्टा ॥ भ० ॥ ६ ॥ गोसावी-
नंदन ह्मणे सर्वांला ॥ थट्टेनें भिऊन तुह्मी चा-
ला ॥ नाहीं तर नेईल नरककुंडाला ॥ अशी ही
थट्टा ॥ भ० ॥ ७ ॥

पद ९ वें.

हुकुम साहेबका साहेबका ॥ हम तो चोप-

दार बांका ॥ ध्रु० ॥ ब्रह्मा विष्णु महेशा ॥ प्रभुका अवतार खासा ॥ हुकुम साहेब० ॥ १ ॥ दश चारोपर सत्ता ॥ ब्रह्म सत्यलोकका दाता ॥ हुकूम साहेबका० ॥ २ ॥ पूर्ण गुरु शिवराम बंदा ॥ बंदगी करले येखादा ॥ हुकूम साहेबका साहेबका० ॥ ३ ॥

पद ६ वें.

रामकथारस पी पी प्राण्या ॥ रामकथा० ॥ ध्रु० ॥ रामकथारस सेविसी जरी तरी ॥ काळ ह्मणेल तुज जीजीजी प्राण्या राम० ॥१॥ संतति संपति जाय जिणें हें ॥ ममता धरणें हें छीछीछी, प्राण्या क० ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे तुज ॥ दुष्टजनाप्रति भीभीभी, प्राण्या रामकथारस० ॥ ३ ॥

पद ७ वें.

मायारे अनिवार, हरि तुझी माया० ॥ध्रु०॥ षड्रिपु वैरी मजला गांजिति ॥ कसा तरेन भवपार ॥ हरि तुझी माया० ॥ १ ॥ पाहूं जातां अंत न लागे ॥ शेषहि थकला फार ॥ हरि तुझी माया० ॥ २ ॥ बाळकृष्णा कृपा करावी ॥ दास विनवी वारंवार ॥ हरि तुझी माया अ० ॥ ३ ॥

जोहार ८ वें.

जोहार मायबाप जोहार ॥ मी तो एक-नाथ महार ॥ लहानसा महाराचा मी पोर ॥ माझे बोलण्याचा विचार ॥ दुसरा नाहीं कीं जी मायबाप ॥ १ ॥ माझ्या बोला ऐकिंजे ॥ मोठे मोठे उमराव राजे ॥ तुह्मीच कां जीवा जी न जाणतां ॥ वेळेस संदेह धरितां कीं जी

मायबाप ॥ २ ॥ चैतन्य चावडीचा पहारा ॥ कीं मी मिराशी महार ॥ जेव्हां नव्हता गांवचा अवार ॥ मज ओळख नाहीं कीं जी मायबाप ॥ ३ ॥ कायापुरचा अचाट पाया ॥ यमाजी बाजी जाले बेहयां ॥ त्यापुढें पाहती पळाया ॥ मनाजीसंगें मिळाले खाया ॥ परि नाहीं वाट कीं जी मायबाप ॥ ४ ॥ पेंढ्या केल्या शिष्यराच्या ॥ खोंडें गाई चारिसी घरच्या ॥ चोप बसतील यमाजीच्या ॥ मग कोण सोडवील कीं जी मायबाप ॥५॥ बाराजणें फुगवितील गाल ॥ शेवटीं तुह्मींच बांधिले जाल॥ तुमचे होतिल बेहाल ॥ तेव्हां तुह्मांस कोण सोडवील कीं जी मायबाप ॥ ६ ॥ सारे कडेचे पोहणारे ॥ दहा आणि

पांच पोरें ॥ एकनाथ करितो जोहार ॥ अक्कल धरा कीं जी मायबाप ॥ ७ ॥

अभंग ११ वा.

अधिकार तैसा करूं उपदेश ॥ साहे ओझें त्यास तेंचि द्यावें ॥ १ ॥ मुंगीवरी भार गजाचें पाळण ॥ घालितां ते कोण कार्यसिद्धि ॥ २ ॥ तुका ह्मणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी ॥ प्रसंगीं तो काढी पारधीच ॥ ३ ॥

अभंग १२ वा.

अनंत लक्षणें भुतांचा मत्सर ॥ मनासी निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥ अंतरींचा रंग उमटे बाहेरी ॥ ओळखि यापरी आपेआप ॥ २ ॥ संत ते समय ओळखती वेळ ॥ संतुष्ट निर्मळ चित्त सदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हित उचितानुचित ॥ मज लागे चित्त आवरावें ॥ ४ ॥

### अभंग १३ वा.

अवघा भार घालीं देवा ॥ नलगे देश डोई घ्यावा ॥१॥ देह प्रारब्धाआधीन ॥ केला तो तो होतो शीण ॥ २ ॥ व्यवसाया निमित्त ॥ परी फळे हें संचित ॥ ३ ॥ तुका ह्मणे फिरे फिरे ॥ भोंवंडीनें दंभ जिरे ॥ ४ ॥

### अभंग १४ वा.

आगी लागो जाणपणा ॥ आड नयो नारायणा ॥ घेईन प्रेमपान्हा ॥ भक्तिसुख निवाडे ॥ १ ॥ यासी तुळे ऐसें कांहीं ॥ दुजें त्रिभुवनीं नाहीं ॥ कालाभात दहीं ॥ ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ २ ॥ निमिषार्धे सत्संगती ॥ वास वैकुंठीं कल्पांतीं ॥ मोक्ष पदें येती ॥ ते विश्रांती बापुडीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेंचि देई ॥

मीतूंपणा खंड नाहीं ॥ बोलिलों त्या नाहीं ॥ अभेदाची आवडी ॥ ४ ॥

अभंग १५ वा.

आजिवरि होतों तुझे सत्तेखालीं ॥ तोंवरी तों केली विटंबना ॥ १ ॥ आतां तुज राहों नेदीं या देशांत ॥ ऐसा म्यां समर्थ केला धणी ॥ २ ॥ सापें रिग गेला कोठें बाळपणीं ॥ होतीसी पापिणी काय जाणो ॥ ३ ॥ तुका ह्मणे म्यां हा बुडविला वेव्हार ॥ तुझेंचि ढोपर सोडावया ॥ ४ ॥

अभंग १६ वा.

आणीक ऐसें कोठें सांगा ॥ पांडुरंगासारिखें ॥ १ ॥ दैवत ये भूमंडळीं ॥ उद्धार कलीं पाववितें ॥ २ ॥ कोठें कांहीं कोठें कांहीं ॥ शोध ठायीं स्थळासी ॥ ३ ॥ अन्यत्रींचें

तीर्थीं नासे ॥ तीर्थीं बसे वज्रलेप ॥ ४ ॥ पांडुरंगींचें पांडुरंगीं ॥ पाप अंगीं राहेना ॥५॥ ऐसें हरें गिरिजेप्रति ॥ गुह्यस्थिति सांगितली ॥ ६ ॥ तुका ह्मणे तीर्थ क्षेत्र ॥ सर्वत्र हें दैवत ॥ ७ ॥

### अभंग १७ वा.

घातलें दुकान ॥ देती आलियासी दान ॥ १ ॥ संत उदार उदार ॥ भरलें अनंत भांडार ॥ २ ॥ मागत्याची पुरे ॥ धणी आणिकांसी उरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोतें ॥ हें तों भरिलें नव्हे रितें ॥ ४ ॥

### अभंग १८ वा.

दगडाचा टाळ घेउनियां हातीं ॥ वाखाणीतो कीर्तीं निज नामें ॥ १ ॥ काय आह्मीं येथें करावीं साधनें ॥ टाळ स्वर गाणें तेंही

नाहीं ॥ २ ॥ तुका ह्मणे माझ्या जीवींच्या जिवलगा ॥ सुखें पांडुरंगा आठवीतों ॥ ३ ॥

अभंग १९ वा.

देव उदार उदार ॥ माथां कर ठेविला ॥ १ ॥ देव मनें देव मनें ॥ आलिंगनें निववी ॥ २ ॥ देव पाहे देव पाहे ॥ दृष्टी धाये लोचन ॥ ३ ॥ देव समोर समोर ॥ तुका कर जोडोनी ॥ ४ ॥

अभंग २० वा.

देव गोंवा देव गोंवा ॥ जिवीं जिवा जिव्हाळा ॥ १ ॥ देव पळे देव पळे ॥ भक्त भोळे त्यापाशीं ॥ २ ॥ देव राहे देव राहे ॥ वस्ती पाहे हृदयीं ॥ ३ ॥ देव सरिसा सरिसा ॥ तुका कैसा भाविक ॥ ४ ॥

पद ९ वें.

रंडी बेस करे बेस करे ॥ नहिं गुरुसे आस करे ॥ रं० ॥ ध्रु० ॥ यार पलंगपर सोवे ॥ खसमजा दरबाजे रावे ॥ रं० ॥ १ ॥ टिकैक टाकमठिकरा ॥ ल्यावे कवडिका नखरा ॥ रं० ॥ २ ॥ जबलग देखे दमडा ॥ तबलग भोग देवे चमडा ॥ रंडी बे० ॥ ३ ॥

पद १० वें.

ब्राह्मण वंदावे वंदावे ॥ कदापि न निंदावें ॥ ध्रु० ॥ सहज विनोद केला ॥ राजा परिक्षिती निमाला ॥ ब्रा० ॥ १ ॥ नहुषें विप्रां छळिलें ॥ त्याचें शरीर अजगर झालें ॥ ब्रा० ॥ २ ॥ यादव उन्मत्त झाले ॥ सकळां कुळां-सहित बुडाले ॥ ब्रा० ॥ ३ ॥

### पद ११ वें.

प्रपंच परमार्थी परमार्थी ॥ अंतर इतुकें पार्थी ॥ ध्रु० ॥ माती घटीं पटीं तंतु ॥ कीं कनक तसे जिव जंतु ॥ १ ॥ प्रपंच परमा०॥ स्थाणु पुरुष अहि दोरा ॥ शुक्ति त्यावरी र- जत विचारा ॥ प्रपंच परमा० ॥ २ ॥ निजा- नंदीं नाना रंग॥उदकीं बुद्बुद लहरि तरंग॥ प्रपंच परमा० ॥ ३ ॥

### बाळसंतोष १२ वा.

बाळसंतोष बाबा बाळसंतोष ॥ ध्रु० ॥ मी तों परात्पर भिकारी॥ बाबा बाळ० ॥ ह्मणुनि आलों संतद्वारीं ॥ बाबा० ॥ द्यावी मज भ- क्तीची भाकरी ॥ बाबा० ॥१॥ किती युगांचा मी जोगी ॥ बाबा० ॥ विभूत चर्चुनिया

अंगीं ॥ बाबा० ॥ गळां वाजवी नाद शिंगी ॥ बा० ॥ २ ॥ त्राहि त्राहि त्राहि त्राहि ॥ बा० ॥ हे तो न मागें न मागें कांहीं ॥ बा- ळ० ॥ नामा ह्मणे सुखधायी ॥ बाबा० ॥ ३ ॥

महारीण १३ वी.

महारणीचे बोल ऐका ॥ पायां पडते म- हारीण आली ॥ गांव वसाड पाडूं नका ॥ हकनाक बसे धक्का ॥ इतुके तुह्मी मतीं त- रका ॥ १ ॥ पायां० ॥ ब्रह्मा विष्णु दोन्ही बाळ ॥ महाकाळाचे हे काळ ॥ मज देखतां गोपाळ ॥ ते मज महारणीपासोनी ॥ २ ॥ पायां० ॥ एका जनार्दनीं महारीण झालें ॥ सद्गुरुला शरण गेलें ॥ त्यानें आपुलें स्वहित केलें ॥ जन्म मरण विसरलें ॥ ३ ॥ पायां० ॥

## गौळण १४ वी.

उद्धव आहे हा मथुरेसी कोणितरिगे पाठवा ॥ कोणितरिगे पाठवागे श्रीहरिला भेटवा ॥ ध्रु० ॥ एक ह्मणती जाउनी सांगा श्रीहरिला विनंती ॥ एक विचार करिती चित्तीं॥ कां रुसले श्रीपती ॥ याच्या मुरलीच्या नादानें मोहिली चित्तवृत्ती ॥ इतराजी आह्मांवरती जाउन पाठवा ॥ उद्धव० ॥ १ ॥ गोकुळांत अनर्थ झाला गोपाळ आणि गाई ॥ गोवत्सें त्यागून फिरती कीं ह्मणति कान्हा नाहीं ॥ ऐशा सकळ जनांच्या वृत्ति वेधल्या हरिपायीं॥ एक ह्मणती शेषशायी हृदयांत आठवा ॥ उद्धव० ॥ २ ॥ गोपीचा ऐकुनि धांवा हरि आले गोकुळांत ॥ आनंदु नरनारीसी नासमवे हृदयांत ॥ व्यासांनीं वर्णन केलें भा-

गवतीं सुमात ॥ ह्या जीवनमूर्तिच्या माळा प्रेमानें गांठवा ॥ उद्धव० ॥ ३ ॥ एक वृत्तांत मधुसूदनासी उद्धवें जाणविला ॥ करुणाकर कृष्ण मुरारी मनीं आपले तोषला ॥ शिवशाळिग्राम सेवेसी शिव तुळशी कोमल्या ॥ दासाच्या चरणीं ठाव देइंगा माधवा ॥ उद्ध० ॥४॥

आरती १९ वी.

आरती ज्ञानराजा ॥ महाकैवल्यतेजा ॥ सेविती साधुसंत ॥ मनु वेधला माझा ॥ध्रु०॥ लोपलें ज्ञान जगीं ॥ हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग ॥ नाम ठेविलें ज्ञानी ॥१॥ कनकाचें ताट करीं ॥ उभ्या गोपिका नारी ॥ नारद तुंबर हो ॥ साम गायन करी ॥ २ ॥ प्रगट गुह्य बोले ॥ विश्व ब्रह्मचि केलें ॥ राम जनार्दनीं पाय एकची ठेले ॥ ३ ॥ आ० ॥

# भजनी मंडळी

## दुसरी.

## बारी ३ री.

### अभंग १ ला.

( चालीला चाल व तोड. )

माझिये मनीं बैसला हरी ॥ नयनामाझारी कोंदला ॥ १ ॥ भरोनियां मनबुद्धी ॥ राहिला संधी इंद्रियांच्या ॥ २ ॥ पाहे तेथें आपणचि दिसे ॥ स्वरूप विलसे पदार्थी ॥ ३ ॥ निळा ह्मणे जें जें कांहीं भासे ॥ तेंही त्याचि रूपें ॥ ४ ॥

### अभंग २ रा.

( चालीला चाल. )

येती जाती होती मरती ॥ नानाकार

भूतव्यक्ती ॥ १ ॥ हा तो आहे जैसा तैसा ॥ अनादि रूपें आपणाचि ऐसा ॥ २ ॥ नाहोनियां सूक्ष्म स्थूळ ॥ वृद्ध तरुण अथवा बाळ ॥ ३ ॥ निळा ह्मणे एकला एक ॥ न होति एक ना अनेक ॥ ४ ॥

अभंग ३ रा.

( चालीला चाल व तोड. )

विठ्ठल विठ्ठल ह्मणोनि छंदें ॥ ब्रह्मानंदें नाचेन ॥ १ ॥ धरूनियां दृष्टी पुढें ॥ रूप चोखडें सुरेख ॥२॥ वारंवार क्षणक्षणा ॥ ठेवीन चरणांवरी माथा ॥ ३ ॥ निळा ह्मणे पुरवा कोड ॥ जाणोनी चाड हे माझी ॥ ४ ॥

अभंग ४ था.

( चालीला चाल व तोड. )

सांगों जातां न कळे वाचा ॥ महिमा कथेचा अपार ॥ १ ॥ श्रवणें पठणें हरिची किर्ती ॥ नाना याती उद्धरल्या ॥ २ ॥ च-

तुष्पदें श्वानसुकरें ॥ श्रवणद्वारें मुक्ति त्यां ॥ ३ ॥ निळा ह्मणे कीटक पक्ष्या ॥ कीर्तनें वृक्षा हरिप्राप्ती ॥ ४ ॥

अभंग ५ वा.

( चालीला चाल व तोड. )

सकुमार साकार परिमळें आगळें ॥ कर्पूर परिमळें घोळीयेला ॥ १ ॥ मित्रपणें करा मधुर अळुमाळा ॥ मधुकर गोपाळा हृदयीं धरा ॥ ध्रु० ॥ भवतरु भवमुळीं भवमूळ छेदन ॥ तेंचि अंगीं चंदन लाविजेसु ॥ २ ॥ बाप रखुमादेविवरु सकुमारु आगळा ॥ वदे श्रुति बाळा वेधलिया ॥ ३ ॥

अभंग ६ वा.

( चालीला चाल व तोड. )

एकी ह्मणे भाव धरूं नेदी मौन ॥ तेथींचें वो ज्ञान मज सांगा ॥ १ ॥ एकीनें सांगितलें

दुजीनें परिसिलें ।। प्रपंचा पुसिलें तेणें रूपें ।। ध्रु० ।। तें घरटें कडीं सोकरि बागडी ।। सोहं कथा उघडी पंढरी दे ।। २ ।। ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीस मनें ।। नयनांसी पारणें देखतांची ३

अभंग ७ वा.

( चालीला चाल व तोड. )

त्रिभुवनींचें सुख एक तत्व विठ्ठल ।। नलगे आह्मां मोल उच्चारितां ।। १ ।। विठ्ठल उघडा मंत्र कळिकाळा त्रास ।। घालुनियां कांस जपों आधीं ।। ध्रु० ।। सत्वर सत्वाचे जपती नामावळी ।। नित्यती आंघोळी घडे राया ।।२।। बाप रखुमादेवीवरु जिव्हाळा हृदयीं ।। जीवाचा जीव ठायीं एकेपातीं ।। ३ ।।

अभंग ८ वा.

( चालीला चाल व तोड. )

एकेंवीण पहा न दिसे द्वैत ।। एकी हेची

मात वेदशास्त्रीं ॥ १ ॥ वेदशास्त्र सांगे आह्मां ह्या श्रीरंग ॥ या नाहीं भंग आत्मपणें ॥ ध्रु० ॥ आनंदैकसुख यासी नाहीं मोहो ॥ भूतबाधा ग्रहो नामेंचि तारी ॥ २ ॥ निवृत्ति ह्मणे पिता सकळ तत्वरहितु ॥ वेदशास्त्रीं दृष्टांतु पाहा तुह्मी ॥ ३ ॥

अभंग ९ वा.

( चालीला चाल व तोड. )

हरिवीण चित्तीं न धरी विपरीत ॥ तरताती पतित रामनामें ॥ १ ॥ विचारूनी पाहा ग्रंथ हे अवघे ॥ जेथें तेथें सांगे रामनाम ॥ ध्रु० ॥ व्यासादिक भले रामनाम पाठीं ॥ नित्यता वैकुंठीं तयां घर ॥ २ ॥ शुकादिक मुनी विरक्त संसारीं ॥ रामनाम निर्धारीं उच्चारिलें ॥ ३ ॥

अभंग १० वा.

( चालीला चाल व तोड. )

निळिये पेरणी निळी हे वाणी ॥ गुणांचीं लेणी कृष्णवर्ण ॥ १ ॥ नवलागे मायें नवलागे चोज ॥ निळिं निळिमाकाज आकारलें ॥ ध्रु० ॥ नीळवर्ण तनु नीळवर्ण गुणु ॥ निळिं निळिमा पूर्णु हृदयीं नांदे ॥ २ ॥ ज्ञानदेवीं लीला मन मनीं निवाला ॥ निळिये अवलीला हरपला ॥ ३ ॥

पद १ लें.

( चालीला चाल. )

येरवीं ब्रह्म सनातन साच ॥ येरवीं ब्रह्म० ॥ ध्रु० ॥ जोंवरि भ्रम हा नांदे हृदयीं ॥ भासे लोकां साच ॥ येरवीं० ॥१॥ सर्पाभास गुणावरि तैसा ॥ खेळत भूतें पांच ॥ येरवीं ब्रह्म० ॥ २ ॥ आनंदात्मज विवरुनि बोले ॥ सर्व मनाचा नाच ॥ येरवीं ब्रह्म० ॥ ३ ॥

पद २ रें.

( चालीला चाल. )

अशाश्वत संग्रह कोण करी ॥ ध्रु० ॥ कोण करी परी सोपे माझ्या ॥ वस्ति बरी विवरीं ॥ अशाश्वत सं० ॥ १ ॥ चिरगुटचिंध्या जोडुनि कंथा ॥ गोधडी हेचि बरी ॥ अशाश्वत संग्र० ॥ २ ॥ नित्य नवें जें देइल माधव ॥ भक्षूं तेंचि घरीं ॥ अशाश्वत सं० ॥३॥ अमृत ह्मणे मज भिक्षेचे डोहाळे ॥ होति अशा लहरी ॥ अशाश्वत सं० ॥ ४ ॥

पद ३ रें.

( चालीला चाल. )

ब्रह्मसुखें सुखरूप॥ असावें ब्रह्मसु० ॥ध्रु०॥ श्रीसद्गुरुवरदानकृपेचें ॥ बळ हृदयांत अमूप ॥ असावें ब्रह्मसु० ॥ १ ॥ गुणदोषास्तव अधरकपाटीं ॥ दृढतर मौन कुलूप ॥

असावें ब्रह्मसु० ॥ २ ॥ हरिगुणकथन किली गुरु आज्ञा ॥ अमृत धरी अनुरूप ॥ असावें ब्रह्मसुखें० ॥ ३ ॥

पद ४ थें.

( चालीला चाल. )

येडका मदन तो केवळ पंचानन ॥ येडका० ॥ ध्रु० ॥ थडक मारिली नारदा, केला रावणाचा चेंदा ॥ दुर्योधना मारिली गदा ॥ घेतला प्राण ॥ तो केवळ पंचानन ॥ १ ॥ थडक मारिली शंकरा, केला ब्रम्ह्याचा मातेरा॥ इंद्र चंद्रासि भेदरा ॥ लाविला ज्यानें ॥ तो केवळ पंचानन० ॥ २ ॥ भस्मासुर मुकला प्राणासी॥ तीच गत झाली वाळीसी ॥ तिसरा विश्वामित्रऋषी ॥ नाडिला जेणें ॥ तो केवळ पंचानन० ॥ ३ ॥ शुकदेवानें ध्यान धरोनी ॥ येडका आणिला आकळोनी ॥ एका जनार्द-

नाचे चरणीं ॥ लाविला जेणें ॥ तो केवळ पंचानन ॥ येडका मद० ॥ ४ ॥

पद ५ वें.

( चालीला चाल. )

बाइल पैशाची बा पै० ॥ विरळागत पुरुषाची ॥ध्रु०॥ धन कनकांतर गांठी ॥ त्याला समान सांगे गोष्टी ॥ बाइल पै० ॥ १ ॥ नेसवि साडी लुगडीं ॥ त्यासी लावी लाडीगोडी ॥ बाइल पै० ॥ २ ॥ भ्रतार वेडा पीसा ॥ त्यासी नित्य करी कर्कशा ॥ बाइल पै० ॥ ३ ॥ शिव दिन गुरुचे पाईं ॥ पैशाविण कांहींच नाहीं ॥ बाइल पैशाची० ॥ ४ ॥

पद ६ वें.

( चालीला चाल व तोड. )

सुखकर साधु संग प्राण्या ॥ सुख० ॥ध्रु०॥ क्षणभंगुर तनु जाणुनि हरिगुणीं ॥ श्रवणीं

कीर्तनीं रंग, प्राण्या सुख० ॥ १ ॥ जाई जिणें हें सर्वहि जाइल ॥ रथ गज धेनु तुरंग ॥ प्राण्या सुख० ॥ २ ॥ वस्त्रें भूषणें कैंचीं अंतीं ॥ कोठें छपरपलंग ॥ प्राण्या सुख० ॥ ३ ॥ आत्माराम बोध ठसाउनी ॥ दृढतर राहे अभंग ॥ प्राण्या सुख० ॥ ४ ॥

पद ७ वें.

( चालीला चाल. )

संत उदार कसे ॥ पहा पहा संत उदार कसे ॥ ध्रु० ॥ दर्शनमात्रें पावन करिती ॥ परिसीं लोह जसें ॥ पहा पहा संत उदा० ॥१॥ ज्ञानपणहें सांडुनि सगळें ॥ दहीं कर्पूर जसें ॥ पहा पहा संत उदार० ॥ २ ॥ चरणामृत पाजुनियां दासा ॥ लाविति ज्ञानदशे ॥ पहा पहा संत उ० ॥ ३ ॥

## पद ८ वें.

( चालीला चाल व तोड. )

जोहार मायबाप जोहार ॥ मी अविद्या-नगरींचा महार साचार ॥ माझें नोहे नगर ॥ आकारास आलें कीं जी मायबाप॥१॥म्यां सहा चाकर ठेविले ॥ ते माझे बळें वर्तती वहिले ॥ मला गांजिती बळें ॥ अन्याय नसतां कीं जी मायबाप ॥ २ ॥ तुह्मी अवघे एकत्र झालां ॥ माझें घर मोडावयाचा मनसुबा केला ॥ जरी माझी अगत्य असेल धन्याला॥ तरीच मजला ठेविल कीं जी मायबाप ॥ ३ ॥ तुह्मी अवघे संत सज्जन ॥ रूपीं मिळालां परिपूर्ण ॥ ह्मणून माझें हेळण करितां कीं जी मायबाप॥४॥ एकाजनार्दनीं ह्मणे देवा ॥ अविद्येचा संग मज नसावा ॥ जन्ममरण ठेवा चुकवा कीं जी मायबाप ॥ ५ ॥

अभंग ११ वा.

( चालीला चाल व तोड. )

अधिकार तैसा दावियेला मार्ग ॥ चालतां हें मग कळोंयेतें ॥ १ ॥ जाळूं नये नांव पावलेनि पार ॥ मागील आधार बहुतांचा ॥ २ ॥ तुका ह्मणे रोग वैद्याचे अंगीं ॥ नाहीं करी जगीं उपकार ॥ ३ ॥

अभंग १२ वा.

( चालीला चाल व तोड. )

अनंत लक्षणें वाणितां अपार ॥ संतांचें घर सांपडेना ॥ १ ॥ जये घरीं संत राहती आपण ॥ तें तुह्मां ठिकाण आतुडेना ॥ २ ॥ ठिकाण धरूनी पाहावे ते संत ॥ उगाच आकांत करूं नये ॥३॥ संत होवोनियां संतांसी पाहावें ॥ तरिच तरावें तुका ह्मणे ॥ ४ ॥

अभंग १३ वा.

( चालीला चाल व तोड. )

अवघा भार वाटे देवा ॥ संतसेवा न

घडतां ॥ १ ॥ कसोटी हे असे हातीं ॥ स-
त्य भूतीं भगवंत ॥२॥ चुकलोंसा दिसे पंथ ॥
गेले संत तो ऐसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोंग
वांया ॥ कारण या अनुभवे ॥ ४ ॥

अभंग १४ वा.

( चालीला चाल व तोड. )

आगी लागो तया सुखा ॥ जेणे हरि नये
मुखा ॥१॥ मज होत कां विपत्ती ॥ पांडुरंग
राहो चित्तीं ॥२॥ जळो तें समूळ ॥ धनसंपत्ति
उत्तम कुळ ॥३॥ तुका ह्मणे देवा ॥ जेणे घडे
तुझी सेवा ॥ ४ ॥

अभंग १५ वा.

( चालीला चाल व तोड. )

आजिवरी होतों संसाराचे हातीं ॥ आता
ऐसें चित्तीं उपजलें ॥ १ ॥ तुला शरणागत
व्हावें नारायणा ॥ अंगीकारा दीना आपुलीया

॥ २ ॥ विसरलों काम याजसाठीं धंदा ॥ सकळ गोविंदा माझें तुझें ॥३॥ तुका ह्मणे विज्ञापना परिसावी ॥ आवडी हे जीवीं झाली तैसी ॥ ४ ॥

अभंग १६ वा.

( चालीला चाल व तोड. )

आणिक एक तया घरीं ॥ दोषा उरी नसेचि ॥ १ ॥ नाहीं थोर सानें परी ॥ वर्ते येरिसारखें ॥ २ ॥ सम ब्रह्म ह्मणती मुखें ॥ करि हरिखें पापासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगूं काय ॥ नाहीं सोय धर्माची ॥ ४ ॥

अभंग १७ वा.

( चालीला चाल व तोड. )

घातलें दुकान ॥ पदीये तैसा आहे वान ॥ १ ॥ आह्मी भांडारी देवाचे ॥ द्यावें घ्यावें माप वाचे ॥२॥ उगवूं जाणों मोडी ॥

झाली नव्हे त्याची जोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पुडी ॥ मोल तैसी खरी कुडी ॥ ४ ॥

अभंग १८ वा.

( चालीला चाल व तोड. )

दगडाच्या देवा बगाड नवस ॥ बाईल कथेस जाऊं नेदी ॥१॥ वेंची धनरासी बांधलें स्मशान ॥ दारीं वृंदावन द्वाड मानी ॥ २ ॥ चोरें नागविला न करी त्याची खंती ॥ परि द्विजाहातीं नेदी रुका ॥ ३ ॥ करी पाहुणेर व्याह्या जांवयासी ॥ आल्या अतितासी पाठमोरा ॥ ४ ॥ तुका ह्मणे जळो धिग् त्याचें जिणें ॥ भारवाही शीण वर्म नेणें ॥ ५ ॥

अभंग १९ वा.

( चालीला चाल व तोड. )

देव एक देव एक ॥ दुजा देख असेना ॥१॥ देव दृढ देव दृढ ॥ धीर धर सांगतों ॥२॥ हाची देव हाची देव ॥ अनुभवें जाणती ॥ ३ ॥

नाहीं संदेहे संदेहे ॥ तुका पाहे उरे त्या ॥४॥

अभंग २० वा.

( चालीला चाल व तोड. )

देव झाला देव झाला ॥ हा भक्तांला कृपाळ ॥१॥ गेला देव गेला देव॥अनुभव मिळोनी॥२॥ देव नाहीं देव नाहीं॥कोणे नवीं दावा हें॥३॥ देव फिरे देव फिरे ॥ चक्राकारें तुक्याच्या ॥४॥

पद ९ वें.

( चालीला चाल. )

सो एक धन मेरी धन मेरी ॥ निर्गुन सागर लहरी ॥ सो० ॥ ध्रु० ॥ भोजनके जब माता ॥ जैसी लोभ करे निज पूता ॥ सो० ॥१॥ सेज पलंगपर सोवे ॥ जैसी रंभा होके भावे ॥ सो० ॥ २ ॥ नीच कामपर दासी ॥ नेमधर्मकुं नहि उदासी ॥ सो० ॥ ३ ॥ केशरी गुरुकी चेली ॥ शिवदिन जेर आवे गाली ॥ सो० ॥ ४ ॥

पद १० वें.

( चालीला चाल. )

वो नर नहिं बारे नहिं बारे ॥ सब दुनिया-सो न्यारे ॥ध्रु०॥ राजा रंक बराबर लेखे ॥ हरदम साहेब देखे ॥ वो० ॥ १ ॥ कंचन मोतियोकर देखे ॥ खाक बराबर लेखे० ॥ २ ॥ पाख नजरसो देखे ॥ परकामिनी माता बराबर लेखे ॥ वो० ॥३॥ मान करे कोई मुपरमारे ॥ दोन येकु प्यारे ॥ वो० ॥ ४ ॥ बालकिसनप्रभु ऐसे बिरले ॥ उनकी संगत कर ले॥ वो० ॥ ५ ॥

पद ११ वें.

( चालीला चाल. )

डोळा उघडेना उघडेना ॥ पश्चात्ताप घडेना ॥ ध्रु० ॥ अहं ममता करणें ॥ नाना योनी जन्मुनि मरणें ॥ डोळा उघ० ॥१॥ चिदचिद्ग्रंथि सुटेना ॥ क्षणभरि विषयीं चित्त

विटेना ॥ डोळा उघ० ॥ २ ॥ निजानंदिं रं-
गेना ॥ निश्चळ निर्मळ भव भंगेना ॥ डोळा
उघडेना उघडेना ॥ पश्चा० ॥ ३ ॥

### बाळसंतोष १२ वा.

( चालीला चाल व तोड. )

बाळसंतोष ॥ बाबा बाळसंतोष ॥ ध्रु० ॥
तुझे अंगींचा उतारा॥ तो मज देइं गा दातारा॥
फिरोनि नये बा संसारा॥ बाळसंतोष० ॥१॥
तुझे मस्तकींचा टोप ॥ देतां होइल प्रताप ॥
तेणें हरती त्रिविध ताप बा० ॥ २ ॥ शालू
पीतांबर सखलाद ॥ ज्ञान कंचुकी ही शुद्ध ॥
तुका ह्मणे मी प्रसिद्ध ॥ दान मागतों ॥३॥

### महारीण १३ वी.

( चालीला चाल व तोड. )

पायां पडते महारीण आली ॥ महारीण
गेली वरच्या आळी ॥ महारणीनें दिली हा-
रळी ॥ जवळ आली काळाची फेरी ॥ १ ॥

माझें महारणीचें ऐका ॥ जागे असा निजूं नका ॥ काळ करीतसे खेपा गा ॥२॥ एकाजनार्दनीं महारीण ॥ करा चंद्रभागे स्नान ॥ घ्यावें पुंडलीकदर्शन ॥ पाहावे विठ्ठलचरण ॥ पायां पडते महारीण आले० ॥ ३ ॥

गौळण १९ वी.

( चालीला चाल. )

गौळण ह्मणती यशोदेला ॥ कोठेंगे सावळा ॥ कां रथ शृंगारिला ॥ सांग हो मजला ॥ अक्रूर उभा असे बाईगे साजणी ॥१॥ ह्या नंदाच्या आंगणीं मिळाल्या गौळणी ॥ बोले नंदाची पट्टराणी सद्गदित होउनी ॥ मथुरेसी चक्रपाणी ॥ जातो गे साजणी ॥ निश्चळ झालें मन हें वचन ऐकोनी ॥ २ ॥ अक्रूरारे चांडाळा तुज कोणी धाडिला ॥ कां घात करूं आलासी वधिसी सर्वांला ॥ अक्रूरा तुझी नामाऐसीच करणी ॥ ३ ॥ रथीं

चढला वनमाळी आकांत गोकुळीं ॥ भूमी-
पडल्या व्रजबाळी कोण त्यां सांभाळी ॥ न-
यनींच्या उदकानें भिजली धरणी ॥ ४ ॥
देव बोले अक्रूरासी वेगें हांकीं रथासी ॥
ह्या गोपिकांच्या शोकासी न पाहवे मजसी ॥
एकाजनार्दनीं ह्मणे रथ गेला निघोनी ॥५॥
ह्या नंदाच्या आंगणीं० ॥

आरती १५ वी.

( चालीला चाल. )

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरुधामा ॥
सच्चिदानंदमूर्ती ॥ पाय दाखवीं आह्मां ॥
ध्रु०॥ आ० ॥ १ ॥ राघवें सागरांत ॥ उदकीं
पाषाण तारीले ॥ कवतुक तुकोबाचें ॥ अभंग
रचियेले ॥ आर० ॥ २ ॥ सच्चिदा तूळणेसी ॥
प्रेम सुखासीं आलें ॥ ह्मणूनि रामेश्वरीं ॥ च-
रणीं मस्तक ठेविलें ॥ आरती० ॥ ३ ॥

समाप्त.